## मुडा केसमध्ये कर्नाटक सीएमला क्लीन चिट

■ वृत्तसंस्था, बंगळुरू, दि. १९ :
कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांना म्हैसूर शहरी विकास प्राधिकरण जमीन घोटाळा प्रकरणात लोकायुक्तांकडून क्लीन चिट मिळाली आहे. सिद्धरामय्या आणि त्यांची पत्नी पार्वती यांच्यासह चार आरोपींविरुद्ध कोणतेही ठोस पुरावे सापडले नसल्याचे लोकायुक्त पोलिसांनी सांगितले.

तपास अधिकाऱ्यांनी तक्रारदार स्नेहमयी कृष्णा यांना सांगितले की, पुराव्याअभावी दोघांवरील आरोप सिद्ध होऊ शकले नाहीत. या प्रकरणी अंतिम अहवाल उच्च न्यायालयात सादर करण्यात आला आहे. सिद्धरामय्या आणि त्यांच्या पत्नीव्यतिरिक्त, त्यांचे मेहुणे मल्लिकार्जुन स्वामी आणि जमीन मालक देवराजू हे देखील आरोपी आहेत.

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर - 440018

महासागर | NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी
जोडी घेतल्यास फक्त 4 रुपयात
महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6

* वर्ष ५० * अंक २३७ * * अमरावती * गुरुवार, दिनांक २० फेब्रुवारी २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

अग्राग्रलेख

## खरीखरी..

# नागडा रणवीर

काल यु-ट्युबवर आणि सोशल मीडियावर 'इंडियाज गॉट लेटेंट' या कार्यक्रमात रणवीर इलाहाबादिया नावाच्या महाविकृत पोराने जे जे प्रसारित केले. त्यातून त्याच्या मनातील किळसवाणी विकृती समोर आलेली आहे. आपल्या कायद्यात न्यायालयाला जे अधिकार आहेत. त्या अधिकारातून पळवाट कशी काढावी. यासाठी वकिलांचे डोके बरोबर काम करते. रणवीर नावाच्या या मात्रागमनीला वाचवण्यासाठी आपले माजी सरन्यायाधीश यांचा मुलगा अभिनव चंद्रचूड कोर्टात उभा राहिला होता. अभिनव चंद्रचूड यांने या नालायक पोट्ट्याचे वकीलपत्र केवळ पैशासाठी घेतले हे उघड आहे. इलाहाबाद म्हणजेच अलाहाबादचे आताचे नाव प्रयाग आहे. उद्या हा इलाहाबादिया एक ॲफिडेव्हीट करून आपले नाव प्रयागिया ही करू शकतो. अशा या विकृत विचाराच्या माणसाची वकिली करताना तीन सरन्यायाधीशांच्या चौथ्या पिढीतील अभिनव चंद्रचूड त्या अतिविकृत हरामखोर इलाहाबादियाचा प्रभावीपणे बचाव करीत होता. न्यायालयाने अभिनव चंद्रचूडला त्याच्या अभद्र कार्यक्रमाचे तुम्ही समर्थन करता काय, असे विचारल्यावर हा दिवटा चंद्रचूड म्हणतो बिलकुल नाही. पण तो कोटार्ला प्रश्न विचारतो. की हे अपराधी कृत्य आहे काय. तेव्हा न्यायालयाने प्रतिप्रश्न केला की, तो ज्याबद्दल बोलला ती अश्लीलता नाही काय. त्याचाही त्याने इन्कार केला. नुपूर शमार्ला तिच्या शब्दांवर कोटार्ने सवलत दिली होती. मग न्यायालय म्हणाले, तुमच्या पक्षकारांनी जी मुक्ताफळे उधळली आहेत. ते बोलणे कुटुंबात एकत्र बसून कोण ऐकू शकेल. असे न्यायालयाने विचारल्यावर त्यावर हे चंद्रचूड म्हणतात माज्या पक्षकाराला त्याची जीभ छाटण्याच्या धमक्या मिळत आहेत. त्यावर न्यायालयाचे माननीय न्यायमूर्ती म्हणाले तुमच्या पक्षकाराला अश्लील भाषा वापरून प्रसिद्धी मिळवायची आहे. न्यायिक प्रणालीची कायद्याशी बांधिलकी आहे. त्याला आलेल्या धमकीवर कायदा आपले कार्य करील. माज्या पक्षकाराला आणि त्याच्या वकिलाला पोलीस स्टेशनमध्ये धक्काबुक्की करण्यात आली. या प्रश्नावर न्यायालयाने सडेतोड प्रतिप्रश्न केला. तो म्हणजे, अशा माणसासोबत वकील पोलीस ठाण्यात का गेले होते. हा वकिली पेशाचा अपमान नाही काय. अशा प्रकारे निर्लज्ज रणवीर इलाहाबादिया याला सर्वोच्च न्यायालयाने जबरदस्त फटकार लगावली आहे. पण आपले कायदे असे आहेत की, इलाहाबादियाच्या अटकेला स्थगिती द्यावी लागली. या इलाहाबादियावर महाराष्ट्र, आसाम आणि राजस्थान येथे गुन्हे दाखल झालेले आहेत. न्यायालय म्हणते तुमचा पक्षकार आपल्या जिभेने जी घाण ओकेल ते ऐकून लोक याची जीभ कापण्याबद्दलही बोलतीलच. त्यामुळे त्याचा कार्यक्रम हा निश्चितपणे त्याच्या मनातील विकृतीचा परिचायक आहे, हे स्पष्टपणे दिसते. न्यायालयाने त्याच्या प्रसारणाला बंदी घातलेली आहे. तसेच त्याबाबत केंद्राला आपले मत विचारलेले आहे. केंद्राकडून उपस्थित असलेल्या वकीलास सर्वोच्च न्यायालयाने स्पष्टपणे सांगितलेले आहे की, सरकारने दखल घेऊन कारवाई केली तर ठीक आहे. परंतु आम्ही मात्र या मुद्याला असेच सोडणार नाही. न्यायालयाने ॲटर्नी जनरल आर व्यंकट रमणी आणि सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी यामध्ये मदत करावी, असेही म्हटलेले आहे. थोडक्यात या इलाहाबादिया सारख्या माणसाच्या रूपातील हैवानाला न्यायालय तसेच सोडणार नाही. उद्या त्याचा गुन्हा सिद्ध झाला. तर त्याला किमान तीन ते कमाल पाच वर्षांची शिक्षा होऊ शकते. या इलाहाबादियासारखे लोक केवळ पैसे कमावण्यासाठी आपण आपल्या आई-बहिणींचा लिलावही करतील. अशा लोकांना नितीन नियमांचे, कौटुंबिक मर्यादेचे आणि सामाजिक सभ्यतेचे जराही भान ठेवावेसे वाटत नाही. असे बेभान प्राणी कायद्याच्या चर्वीतचर्वणात मोकळे सुटू नयेत. हीच सामान्य जनतेची अपेक्षा आहे. सर्वोच्च न्यायालयाने हे प्रकरण गंभीरपणे घेतलेले आहे. हे न्यायालय या नंग्या माणसाला मुळीच माफी देणार नाही. अशी आपण आशा करूया.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## छत्रपतींच्या जयंतीदिनी वाहिली श्रद्धांजली
# राहुल गांधींवर टीकेचा भडीमार

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १८ :
लोकसभेतील विरोधीपक्ष नेते राहुल गांधी जयंतीदिवशी शिवरायांना श्रद्धांजली वाहिली. त्यामुळे नव्याच वादाला तोंड फुटले आहे. राहुल गांधी यांच्याकडून महापुरुषांचा सतत अपमान सुरू असल्याचा आरोप करत भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसने माफी मागावी, अशी मागणी केली आहे.

महाराष्ट्रासह देशभरात आज शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी केली गेली. शिवप्रेमींपासून राजकारण्यापर्यंत सर्वच स्तरातील लोकांनी शिवजयंतीच्या शुभेच्छा दिल्यात. त्यात राहुल गांधी यांनीही शुभेच्छा दिल्या. मात्र शिवजयंतीनिमित्ताने छत्रपती शिवरायांना अभिवादन करण्याऐवजी राहुल गांधी यांनी श्रद्धांजली या शब्दाचा उल्लेख केला.



### माफीची मागी : भाजप

महाराष्ट्रातील लोकांचा, महापुरुषांचा राहुल गांधी यांच्याकडून सतत अपमान केला जातो. जयंतीच्या दिवशी आदरांजली वाहतात. परंतु राहुल गांधी महाराष्ट्रातील महापुरुषांच्या विषयी अनादार व्यक्त करतात. त्यातील हा गंभीर प्रकार आहे. त्यांनी हे ट्विट मागे घ्यावे, अन्यथा त्यांना कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागले, असा इशारा भाजप नेते अतुल भातखळकर यांनी दिला आहे.

राहुल गांधी यांनी छत्रपती शिवरायांच्या जयंतीनिमित्त एक्सवर एक पोस्ट केली आहे. त्यात ते म्हणतात की, शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त मी त्यांना विनम्र श्रद्धांजली अर्पण करतो.

दरम्यान, या ट्विटवर भाजपाकडून सडकून टीका केली जात आहे. राहुल गांधींनी देशाची, जनतेची आणि शिवप्रेमींची माफी मागितली पाहिजे. शिवरायांच्या पुतळ्यासमोर येऊन नतमस्तक व्हावे, अशी मागणी मंत्री नीतेश राणे यांनी केली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते अमोल मिटकरी यांनी देखील राहुल गांधींच्या या पोस्टवर आक्षेप घेतला. राहुल गांधी यांच्याकडून ही चूक झाली असेल तर त्यांनी माफी मागावी, ट्वीटमध्ये दुरुस्ती करावी, असे ते म्हणाले.

दुसरीकडे, काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी भाजपावर पलटवार केला आहे. राहुल गांधींनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त केलेल्या ट्वीटवर भाजपने गळा फाटेपर्यंत जो गदारोळ सुरू केलाय, तो त्यांचा दुटप्पीपणा आहे.

पंतप्रधानांच्या अधिकृत सोशल मीडिया हँडलवरून, पीएमओच्या हँडलवरून पंतप्रधानांनी देखील श्रद्धांजलीच वाहिली आहे. ते जरा डोळे उघडून पाहावे, असा घणाघात विजय वडेट्टीवार यांनी केला.

### प्रदेशाध्यक्षांकडून सारवासारव

राहुल गांधींनी केलेल्या ट्वीटमुळे वाद उफळला असता, काँग्रेस प्रदेशाध्यक्षांकडून सारवासारव केली जात आहे. राहुल गांधींनी शिवाजी महाराजांना अभिवादन करत असताना काय म्हटले, तर माय हंबल ट्रिब्युट. म्हणजे मी त्यांना अभिवादन करतो, नमन करतो हा त्यांचा त्या मागचा भाव आहे. आता 'ध' चा 'मा' करून विनाकारण घाणेरडे राजकारण विरोधकांनी करू नये, असे स्पष्टीकरण महाराष्ट्र काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिले.

## रेखा गुप्ता होणार दिल्लीच्या मुख्यमंत्री

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १९ :
दिल्लीच्या मुख्यमंत्रिपदासाठी रेखा गुप्ता यांचे नाव अंतिम झाले आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, आरएसएसने त्यांचे नाव प्रस्तावित केले, जे भाजपने स्वीकारले आहे.



प्रवेश वर्मा हे उपमुख्यमंत्री तर विजेंद्र गुप्ता हे विधानसभा अध्यक्ष असतील. पक्ष निरीक्षक रविशंकर प्रसाद आणि ओम प्रकाश धनखड यांनी पक्ष कार्यालयात एक-एक करून आमदारांशी चर्चा केली आणि नंतर त्यांची नावे जाहीर केली.

मुख्यमंत्र्यांचा शपथविधी गुरुवार २० फेब्रुवारी रोजी दुपारी १२:३५ वाजता रामलीला मैदानावर होईल. दिल्लीच्या मुख्य सचिवांनी पाठवलेल्या निमंत्रणात मुख्यमंत्र्यांसह मंत्र्यांच्या शपथविधीचाही उल्लेख आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, भाजप दलित, पूर्वांचल आणि जाट यांचे मिश्रण करू शकते. दोन उपमुख्यमंत्री असू शकतात. या कार्यक्रमाला ३० हजार पाहुणे उपस्थित राहण्याची अपेक्षा आहे.

दरम्यान, रेखा गुप्ता म्हणाल्या, भाजपमध्ये मुख्यमंत्रिपदाचा कोणीही दावेदार नाही. हे सर्व पक्ष ठरवते, ज्याला जबाबदारी दिली जाईल तो वचनबद्धतेने काम करेल. मला पूर्ण विश्वास आहे की भाजपच्या मुख्यमंत्र्यांसह दिल्लीत एक नवीन अध्याय सुरू होईल. दिल्ली अनेक विकासकामांसह एक नवीन कहाणी लिहील, लोकांना अधिकार मिळतील, सर्व कामे होतील. उद्याच्या शपथविधी सोहळ्यासाठी खूप उत्साह आहे.

## महाकुंभात ७४ भाविकांचा मृत्यू

■ वृत्तसंस्था
लखनौ, दि. १९ :
उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी बुधवारी विधानसभेत मौनी अमावस्येच्या दिवशी महाकुंभमेळ्यात झालेल्या चेंगराचेंगरीचा उल्लेख केला. त्या दिवशी ३७ लोकांचा मृत्यू झाल्याचे सांगण्यात आले. संगम किनाऱ्यावरील बॅरिकेड तुटल्याने चेंगराचेंगरी झाली. ६६ भाविक बाधित झाले. त्यापैकी ३० जणांचा मृत्यू झाला होता.



मुख्यमंत्री योगींची माहिती

त्या दिवशी प्रयागराजमध्ये वेगवेगळ्या ठिकाणी काही दाब बिंदू तयार झाले होते, तिथेही ७ लोकांचा मृत्यू झाला. या सर्व घटनांचा संबंध चेंगराचेंगरीशी जोडला जाऊ नये.

३६ मृतांपैकी ३५ जणांच्या कुटुंबियांनी मृतदेह घरी नेले. एकाची ओळख पटू शकली नाही. त्यांचे अंतिम संस्कार करण्यात आले आहेत. डीएनए जतन करण्यात आला आहे. एका जखमीवर अजूनही वैद्यकीय महाविद्यालयात उपचार सुरू आहेत.

मुख्यमंत्री योगी म्हणाले, यावेळी सरकारने प्रशासकीय व्यवस्थेला सर्वोच्च प्राधान्य दिले. सरकारने अनेक जिल्ह्यांमध्ये होल्डिंग एरिया आणि पार्किंग सुविधांची व्यवस्था केली, ज्यामुळे वाहतूक आणि गर्दी नियंत्रणात लक्षणीय यश मिळाले. प्रयागराज शहराची कमाल क्षमता २५ लाख आहे, तिथे ७ कोटी भाविकांना सुरक्षित स्नान करणे हे चमत्कारापेक्षा कमी नव्हते. हा समाजाचा उत्सव असल्याचेही ते म्हणाले.

## काकांचा एकमेव आमदार अजित पवारांच्या सोबत

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. १९ :
छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त शिवनेरी किल्ल्यावर शिवजयंतीचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात मंचावर अजित पवारांच्या मागे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार बापू पठारे हे देखील होते.

शरद पवार गटातील वडगाव शेरीचे बापू पठारे हे एकमेव आमदार आहेत. शिवनेरी किल्ल्यावर शासकीय कार्यक्रमात अजित पवार यांच्या मागे बापू पठारे बसले होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंचावरून उपस्थितांशी संवाद साधला त्यावेळी आमदार बापू पठारे यांच्या नावाचा देखील उल्लेख केल्याचे दिसून आले, त्यामुळे आता राजकीय वर्तुळात अजित पवार शरद पवारांना धक्का देण्याच्या तयारीत आहेत का अशा चर्चा रंगल्या आहेत.

बापू पठारे हे शरद पवार गटाचे एकमेव आमदार आहेत, पण आता ते शरद पवारांची साथ सोडणार का? असा सवाल उपस्थित झाला आहे. यावर स्पष्टीकरण देताना मतदारसंघातील कामानिमित्त भेट घेतल्याचे बापू पठारे यांनी सांगितले आहे. मात्र, पठारे शरद पवार यांची साथ सोडून अजित पवार गटात जाणार असल्याची चर्चा आहे.

## उपमुख्यमंत्री शिंदेंचा नागपूर दौरा रद्द?

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १८ :
शिवसेनेच्या ऑपरेशन टायगरला विदर्भात नमनालाच अडथळा आला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे २० फेब्रुवारीला नागपूर दौऱ्यावर होते. पण अचानक त्यांचा रद्दा एक दिवस पुढे ढकलण्यात आला आहे. ते २१ ला येणार आहे. मात्र त्याचे कारण मात्र कळू शकले नाही.



ऑपरेशन टायगर विदर्भात राबवण्याच्या हेतूने शिंदे यांचा विदर्भ दौरा आयोजित करण्यात आला होता. गुरुवारी २० फेब्रुवारीला एकनाथ शिंदे नागपूर जिल्ह्यातील रामटेक मतदारसंघात कन्हान येथे आभार सभा घेणार होते. या दौऱ्याची जय्यत तयारी करण्यात आली आहे.

या सभेत नागपूरसह विदर्भातील ठाकरे गटाचे काही प्रमुख नेते शिंदे गटात प्रवेश करणार, असे रामटेकचे शिवसेनेचे आमदार व मंत्री आशीष जयस्वाल यांनी पत्रकार परिषदेत जाहीर केले होते. त्यामुळे शिंदेंच्या दौऱ्याकडे सर्वांचेच लक्ष लागले होते. मात्र बुधवारी अचानक शिंदे यांचा २० तारखेचा दौरा रद्द झाल्याचे वृत्त धडकले.

सुधारित दौऱ्यानुसार ते २१ तारखेला येणार आहे. ते गोंदियाला जाणार असून तेथून परत आल्यावर दुपारी कन्हान येथे सभा घेणार असल्याचे कळवण्यात आले आहे. सभेची सर्व तयारी पूर्ण झाल्यानंतर अचानक शिंदेंच्या दौरा पुढे ढकलल्याने राजकीय वर्तुळात तर्कवितर्क लावले जात आहे.

पालकमंत्र्यांच्या नियुक्त्या, आमदारांच्या सुरक्षेत कपात व अन्य मुद्यांवरून सध्या भाजप व शिंदे गटात तणाव निर्माण झाला आहे. महायुतीत सर्वकाही सुरळीत आहे, असा दावा खुद्द शिंदे यांनी माध्यमांशी बोलताना केला असला तरी या दोन्ही पक्षात समन्वयाचा अभाव असल्याचे चित्र आहे.

शिंदे सेनेच्या ऑपरेशन टायगरला प्रत्युत्तर म्हणून भाजपने शिवसेनेचे कट्टर विरोधक मलिक्कार्जून रेड्डी यांना पक्षात पुन्हा प्रवेश दिला आहे. हा शिवसेनेला एक प्रकारे संदेश देण्याचा प्रयत्न मानला जातो. या पार्श्वभूमीवर शिंदेंचा उद्याचा दौरा एक दिवस पुढे ढकलणे हे महत्वाचे ठरते.

### शपथविधीसाठी सीएम फडणवीस डीसीएम शिंदे आज दिल्लीत

दिल्लीतील रामलीला मैदानात आज, गुरुवारी भाजपच्या नवनिर्वाचित मुख्यमंत्र्यांचा शपथविधी होणार आहे. या शपथविधीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार उपस्थित राहणार आहेत. त्यामुळेच शिंदे यांचा विदर्भ दौरा रद्द करण्यात आला आहे.

## सीईसी नियुक्ती कायद्यावरील सुनावणी लांबली

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १९ :
निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीच्या कायद्याला आव्हान देणाऱ्या याचिकेवरील सुनावणी बुधवारी सर्वोच्च न्यायालयात पुढे ढकलण्यात आली. न्यायमूर्ती सूर्यकांत आणि एन. कोटीश्वर सिंह यांच्या खंडपीठाने सांगितले की वेळेअभावी या प्रकरणाची सुनावणी होळीच्या सुट्टीनंतर होईल. सध्या तरी कोणतीही तारीख निश्चित केलेली नाही.

याचिकाकर्ता एनजीओ असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स कडून बाजू मांडणारे वकील प्रशांत भूषण म्हणाले की हा एक महत्त्वाचा मुद्दा आहे. याचा त्वरित विचार करणे आवश्यक आहे.

पंतप्रधान, विरोधी पक्षनेते आणि मुख्य न्यायाधीशांचा समावेश असलेल्या पॅनेलद्वारे सीईसी आणि ईसीची नियुक्ती करण्याचा २०२३ चा निर्णय पाळावा की सीजेआयना पॅनेलपासून दूर ठेवणारा २०२३ चा कायदा पाळावा, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. १७ फेब्रुवारी रोजी केंद्र सरकारने ज्ञानेश कुमार यांची मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून नियुक्ती केली.

यापूर्वी १२ फेब्रुवारी रोजी सुनावणी होणार होती, परंतु त्या दिवशी खटला सूचीबद्ध करण्यात आला नव्हता. तेव्हा ज्येष्ठ वकील प्रशांत भूषण यांनी न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती एन. कोटीश्वर सिंह यांच्या खंडपीठासमोर हा मुद्दा उपस्थित केला.

## धनंजय मुंडेंनी खोटे जीआर काढले

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई,दि. १८ :
अंजली दमानिया यांनी धनंजय मुंडे यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. धनंजय मुंडे यांची मंत्रिपदावर बसण्याची देखील लायकी नसल्याचे अंजली दमानिया यांनी म्हटले आहे.

अंजली दमानिया यांचा आरोप



धनंजय मुंडे हे मंत्रिमंडळातून बाहेर पडत नाहीत तोपर्यंत या हत्येच्या शोधाला दिशा मिळणार नाही. मी सुरुवातीला कराड आणि मुंडे यांचा कसा संबंध आहे हे मी दाखवले. कराड आणि धनंजय मुंडे हे कंपन्यांमध्ये एकत्र कसे आहेत ते मी दाखवले, त्यांचे आर्थिक व्यवहार असो, मिळालेला नफा असो, दहशत असो मग ऑफिस ऑफ प्रॉफिटमध्ये मी दाखवले राज्याच्या मंत्र्याला राज्याच्या कंपनीकडून थेट नफा मिळत आहे. बॅलन्स शिटच्या बॅलन्स शिट भरले जात आहेत. त्यानंतर मी कृषी घोटाळा बाहेर काढला, असे अंजली दमानिया म्हणाल्या.

दमानिया म्हणाल्या, कृषी घोटाळ्यात मी दाखवले की 80-90 रुपयांचे नॅनो युरियाला 220 रुपयांनी खरेदी केली गेली. धनंजय मुंडे तर काय काय करतात यावर मला आता बोलावे वाटत नाही. मंत्रिमंडळाच्या बैइकीत निर्णय झालेला नसतानाही खोटे जीआर काढून धनंजय मुंडे यांनी मोठे घोटाळे केल्याचे त्या म्हणाल्या.

## मंत्रालयातील उपहारगृहात एफडीएचा छापा

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई,दि. १८ :
मंत्रालयातील उपहारगृहावर मंगळवारी खाद्य आणि औषध प्रशासनाकडून छापा मारण्यात आला. तथापि, या छाप्याची माहिती आधीच उपहारगृह व्यवस्थापनाला मिळाल्याने, त्यांची तयारी उत्तम दिसून आली.

छापेमारी दरम्यान उपहारगृहातील कर्मचारी कडक इस्त्री केलेले कपडे आणि डोक्यावर कॅप घालून कार्यरत होते. यामुळे, व्यवस्थापनाच्या स्वच्छतेची आणि गुणवत्ता राखण्याच्या कटीबद्धतेची झलक दिसली. अन्नपदार्थांच्या बाबतीत, आजच्या भाजीचे तेल योग्य प्रमाणात वापरण्यात आले होते. त्याचप्रमाणे, अन्नाची गुणवत्ता देखील दजेर्दार होती. यामुळे, एफडीएच्या पथकाने तपासणी केल्यावर, अन्नपदार्थांमध्ये कोणतीही कमी आढळली नाही. ग्लास देखील स्वच्छ ठेवले गेले होते.

## ज्येष्ठ नेते अनंतराव घारड यांचे निधन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १८ :
काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अनंतराव घारड यांचे आज बुधवार १९ फेब्रुवारी रोजी माजी केंद्रीय गृहमंत्री दिवंगत शंकरराव चव्हाण यांचे ते निकटवर्तीय होते. यासोबतच बाळासाहेब विखे - पाटील यांच्यासोबत देखील त्यांचे घनिष्ट संबंध होते.



प्रादेशिक निवड मंडळाचे काही काळ ते अध्यक्ष होते. प्रदीर्घ काळ काँग्रेसमध्ये राहिल्यानंतर माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी भाजपात प्रवेश केल्यानंतर घारड यांनी देखील काँग्रेसच्या सर्व पदांचा राजीनामा दिला होता.

घारड यांची अंत्ययात्रा गुरुवार २० फेब्रुवारी रोजी नागपूर येथील त्यांच्या निवासस्थानावरून सकाळी ९.३० वाजता निघणार असून अंत्यविधी अंबाझरी घाट येथे होणार आहे. आज त्यांच्या निधनाचे वृत्त कळताच सर्वपक्षीय नेते, पदाधिकाऱ्यांनी त्यांच्या निवासस्थानी जाऊन अंत्यदर्शन घेतले.

अनंतराव घारड यांना प्रदेश काँग्रेसने मानाचे स्थान दिले होते. इतर काही नेत्यांसह त्यांना अ. भा. काँग्रेस समितीवर प्रतिनिधी म्हणून पाठविण्यात आले होते. अ.भा. काँग्रेस समितीचे महासचिव अविनाश पांडे, माजी केंद्रीय मंत्री विलास मुत्तेमवार यांच्यासह अनंतराव घारड, डॉ. बबनराव तायवाडे, अभिजित सपकाळ यांचा त्यात समावेश होता.

प्रादेशिक दुय्यम सेवा मंडळाचे अध्यक्ष असतानाच्या काळात त्यांनी विदर्भातील अनेक गरजू आणि आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील तरूणांमधील प्रतिभा हेरून त्यांना नोकरीसाठी सर्वतोपरी सहकार्य केले होते. घारड यांच्या प्रयत्नांमुळेच अनेक तरूण त्याकाळी नोकरीत लागले. नागपूर आणि लगतच्या भागात काँग्रेसच्या वाढीसाठी अनंतराव घारड यांनी मोठी मेहनत घेतली होती. अशोक चव्हाण यांनी काँग्रेस सोडल्यापासून घारडही दुरावले होते.

## माओवादी नेता दिलीपला अटक



२०१३ पासून ट्रक ड्रायव्हर म्हणून लपला होता

■ महासागर प्रतिनिधी
यवतमाळ, दि. १८ :
झारखंडमधील माओवादी नेता दिलीप याला यवतमाळ पोलिसांनी अटक केली आहे. दिलीप गत अनेक वर्षांपासून ड्रायव्हर म्हणून लपून बसला होता. यवतमाळ पोलिसांनी त्याच्या मुसक्या आवळल्या. झारखंड पोलिसांनी येथे येऊन त्याची ओळख पटवली. दिलीप याची अटक नक्षलविरोधी मोहिमेचे एक मोठे यश मानले जात आहे.

दिलीप हा झारखंड येथील कुख्यात हुहुरुं दलमचा नक्षली कमांडर होता. तो २०१३ पासून यवतमाळमध्ये वास्तव्यास असल्याची खबर पोलिसांना मिळाली होती. तत्पूर्वी त्याने काही वर्षे मुंबईत एका बोअरिंगच्या मशीनवर काम केले होते. त्यानंतर एका व्यक्तीच्या माध्यमातून तो यवतमाळ येथे आला होता. तो तिथे ट्रक ड्रायव्हर म्हणून काम करत होता. झारखंड पोलिसांनी यवतमाळमध्ये येऊन त्याची ओळख पटवली. त्यानंतर स्थानिक पोलिसांनी बुधवारी त्याला अटक केली. या प्रकरणी यवतमाळ पोलिसांचा सातत्याने झारखंड पोलिसांशीही पत्रव्यवहार सुरू होता.

उल्लेखनीय बाब म्हणजे दिलीप याच्यावर नक्षली चळवळीसाठी आर्थिक वसुली करण्याची जबाबदारी होती. त्याने भुसुरुंग स्फोटही घडवून आणल्याचा दावा आहे. दलमच्या आर्थिक व्यवहारात त्याने गैरव्यवहार केला. त्यामुळे त्याने जिवाच्या भीतीने झारखंड सोडून मुंबई गाठली. तेव्हापासून त्याचे महाराष्ट्रात वास्तव्य आहे. अखेर पोलिसांनी त्याच्या मुसक्या आवळल्या.

### महाकुंभमध्ये मुलीची गळा चिरून हत्या

■ प्रयागराज, दि. १९ :
महाकुंभात स्नान करण्यासाठी आलेल्या एका मुलीची गळा चिरून हत्या करण्यात आली. बाथरूममध्ये मृतदेह आढळला. मुलीसोबत आलेला तरुण फरार आहे.

या दोघांनीही झुसीमध्ये एक खोली घेतली आणि एकमेकांची ओळख पती-पत्नी म्हणून करून दिली. तिचा खून करून हा तरूण फरार झाला आहे

# ऑपरेशन टायगर मोडून काढणार उद्धव ठाकरे

### शिंदेंविरोधात रणनीती आखली, पक्षाला लागलेली गळतीही थांबवणार

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई,दि. १८ :
उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेचे ऑपरेशन टायगर मोडून काढण्यासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आता स्वतः मैदानात उतरलेत.

त्यांनी गत काही दिवसांपासून पक्षाला लागलेली गळती रोखण्यासाठी एक खास रणनीती आखली आहे. या अंतर्गत त्यांनी पक्षाचे नेते, उपनेते व सचिव यांच्या खांद्यावर खास जबाबदारी टाकली आहे.



ठाकरे गटाचे माजी आमदार राजन साळवी यांनी नुकताच शिंदे गटात प्रवेश केला. त्यानंतर कोकणातील अनेक पदाधिकारी एकनाथ शिंदे यांच्यासोबत गेले. माजी आमदार सुभाष बने हे ही शिंदे गटात गेले.

मुंबईतील पदाधिकारी व माजी नगरसेवकांनीही सत्ताधारी शिवसेनेचा रस्ता धरला. पक्षाला हे धक्क्यांवर धक्के बसत असताना उद्धव ठाकरे यांनी आपली पक्षसंघटना बळकट करण्यासाठी बैठकांचा सपाटा लावला आहे. या प्रकरणी त्यांनी आपल्या पहिल्या व दुसऱ्या पळीतील नेत्यांवर काही विशेष जबाबदाऱ्या सोपवल्याची माहिती आहे.

वृत्तानुसार, ठाकरे गटातील नेत्यांसह उपनेते व सचिव पदी असणाऱ्या नेत्यांना डॅमेज कंट्रोलसाठी व पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी विशेष जबाबदारी देण्यात आली आहे. पक्षाची स्थिती जाणून घेऊन त्यानुसार पाऊले उचलण्यासाठी दर मंगळवारी ठाकरे गटाच्या नेत्यांची मुंबईतील सेना भवनात बैठक होईल. उद्धव ठाकरे यांनी पक्षाच्या संघटनेतही काही फेरबदल करण्याचा निर्णय घेतला आहे.



**९८ वे अखिल भारतीय साहित्य संमेलन दिल्ली येथे होत आहे. या संमेलनाचे उद्घाटन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे. साहित्य संमेलनाच्या पार्श्वभूमीवर अमरावतीचे ज्येष्ठ साहित्यिक वसंत आबाजी डहाके यांना २०१२ साली चंद्रपूर येथे झालेल्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचा सन्मान मिळाला होता. त्यांच्या अध्यक्षीय भाषणातील काही अंश ....**

----------------

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे त्रेपन्नावे अधिवेशन ५ जानेवारी १९७९ रोजी चंद्रपूर येथे झाले होते. त्यावेळी संमेलनाचे अध्यक्ष प्रख्यात कथाकार प्रा. वामन कृष्ण चोरपडे हे होते. आणि स्वागताध्यक्ष श्रीयुत शांतारामजी पोटदुखे हे होते. त्यावेळच्या संमेलनात मी माझ्या एकदोन कविता वाचल्या होत्या. तेहतीस वर्षांनंतर आज दिनांक ३ फेब्रवारी २०१२ रोजी मी माझे अध्यक्षीय भाषण करायला उभा राहिलो आहे. खरे तर मी माझ्या घरी, माझ्या कुटुंबात परत आलो आहे, अशीच माझी भावना आहे.

मी भाषेच्या घरात राहतो, भाषेच्या प्रदेशात माझा रहिवास आहे. हे घर खूप मोठे आहे. हा प्रदेश खूप विस्तीर्ण आहे. मी या घराच्या विविध दालनांमधून वावरतो. गवाक्षांतून बाहेर पाहातो. याच्या तळघरांतून आणि भुयारांतून हिंडत असतो. याची कित्येक दालने अजून मी पाहिलेली देखील नाहीत. परंतू माझे संचित मोठे आहे. याच घरात वावरलेल्या कित्येक महानभावांचे ते अक्षरसंचित आहे. तो माझा ठेवा आहे, मी काही थोडी टिपणे तेवढी काढलेली आहेत.

थोडा विसावा घ्यावा म्हणून मधून मधून मी माझ्या महाकाय पूर्वजांच्या तळहाताएवढ्या कोपऱ्यात येतो. या जागेजवळ एक अवाढव्य खिडकी आहे. तीमधून मी बाहेर डोकावतो. मी आत आणि बाहेर पाहण्याचा नेहमीच प्रयत्न करीत असतो. फार थोडे मला जमले आहे. माझ्या आतही एक जग आहे आणि त्यात सतत कोलाहल सुरू असतो. या कोलाहलातही एक शांत स्वर शोधण्याचा माझा प्रयत्न असतो, मी आता या क्षणी मी माझ्या आतल्या आणि बाहेरच्या कोलाहलासह आपणासमोर उभा आहे.

तेहतीस वर्षांनंतरचे चंद्रपूर पुष्कळच वाढले, विस्तारले आहे. सगळीच निमशहरे, शहरे, महानगरे आपले रूप बदलत आहेत. इतिहासातच झोपून गेल्यासारखे वाटणारे हे शहरही आता पापण्या उघडून इकडेतिकडे पाहू लागले आहे. श्रीमहाकाली, अचलेश्वर यांच्यानंतर सुपर थर्मल पॉवर प्लांट हे आधुनिक काळातले नवे देवालय इथे आलेले आहे. या रोपट्यातून निघालेले विजेचे हात दूरपर्यंत पोचलेले आहेत. शहरांत झगमगाट आहे, परंतु खेड्यांमध्ये, रानांमध्ये प्रकाशाचे थेंब पाझरत आहेत की नाहीत याबद्दल मी साशंक आहे. मधून मधून मला मात्र डोळ्यांमधले अंगार फुललेले दिसतात.

उन्हाचा, पावसाचा स्पर्श झाला नाही तर झाडेही वेडीवाकडी वाढत जातात, तेथे माणसांचे काय. याच शहराच्या रस्त्यांवरून माझे बालपण चालत गेले आणि याच शहरात मला केव्हातरी कवितेच्या कीटकाचा दंश झाला. महाकाली, त्या देवीच्या पलिकडच्या अजस्त्र पाषाणमूर्ती माझ्या कवितांमध्ये प्रतिमा म्हणून येऊ लागल्या. तेव्हाच्या योगभ्रष्ट या प्रदीर्घ कवितेत मी लिहिले होतेः चांदा हे शहर अमुकसाठी प्रसिद्ध असून तमूकसाठी अप्रसिद्ध असले तरी येथे दर चैत्र पौर्णिमेला महाकालीची मोठी यात्रा भरते.

त्यावेळी महाकालीचे जे मला जाणवले होते तेही लिहिले..

*महाकाली...*
*जळते डोळे...*
*जळते हास्य...*
*जळते. उघडे नागडे नृत्य...*

हे नृत्य विध्वंसाचे नाही, सर्जनाचे आहे. विध्वंसापेक्षा सर्जनावर माझा जास्त विश्वास आहे. समाजाची जुनाट खिळखिळी झालेली संरचना नष्ट केली पाहिजे. परंतु त्या ठिकाणी नवी आणि अधिक उत्तम अशी संरचना उभारली पाहिजे हे मी त्यावेळच्या माझ्या लोकांचा आकांत या कवितेत लिहिले होते. अर्थात माझ्या लोकांचा आकांत अद्याप मावळला नाही. अजूनही दूरवर पसरलेल्या

# मराठी बोलीभाषेचे संवर्धन

अरण्यांमधून दुःखितांचे विव्हल स्वर वाऱ्यावरून माझ्यापर्यंत पोचतात.

जोवर मराठीच्या विविध बोली बोलल्या जात आहेत, प्रमाण मराठीत शिक्षित लोक आपले व्यवहार करीत आहेत, मराठी माध्यमांच्या शाळा बहुसंख्येने आहेत तोपर्यंत मराठी भाषा टिकून राहण्याचे उपाय करणे शक्य आहे. मराठीला पर्याय म्हणून इंग्रजीची (आणि माहिती तंत्रज्ञानाची, इलेक्ट्रॉनिक्सची) निवड करण्याचा विकल्प आपण ठेवतो तेव्हाच मराठीचे स्थान दुय्यम कसे आहे हे आपण दाखवत असतो. या विषयांचा स्वीकार करूनही मराठी हा विषय अनिवार्य असलाच पाहिजे असे धोरण आखले पाहिजे आणि त्याची कडक अंमलबजावणी केली पाहिजे.

गेली काही वर्षे मराठीची गरज कशी नाही याचा वृत्तपत्रांतून प्रचार करण्यात गेलेली आहेत, विशेषतः विज्ञान आणि वाणिज्य शाखांमधल्या विद्यार्थ्यांवर आणि त्यांच्या पालकांवर मराठी नको या मताचा प्रभाव टाकण्यात आलेला आहे. पुढे तर प्रश्नच नाही. भाषेचा किंवा साहित्याचा बाराही लागू नये अशीच व्यवस्था केलेली आहे. आपण पहिलीपासून दहावीपर्यंत मराठीचा आग्रह धरलेला आहे.

अकरावीपासून मराठी विषय सोडला तरी चालेल अशी व्यवस्था केलेली आहे. हे योग्य नाही. लोकांनी ते रोखायला हवे आहे. कुठलेही विषय घ्या, पण एक विषय मराठी हा असलाच पाहिजे असा लोकांनी आग्रह धरायला पाहिजे, आणि शासनानेही विचार करायला पाहिजे. जी मुले अकरावी-बारावीला मराठी विषय घेतात त्यातही काही बीएला जातात आणि मराठी साहित्य हा विषय घेतात. बीएससी, बीकॉमकडे जाणाऱ्यांना मराठी साहित्य हा विषय घेण्याची संधीच आपण नाकारलेली आहे.

अभियांत्रिकी, तंत्रज्ञान, वैद्यकविद्या, व्यवस्थापनविद्या यांच्याकडे बहुसंख्य विद्यार्थी जातात. त्याच्या अभ्यासात भाषा नाही आणि साहित्यही नाही. म्हणजे मराठी वाचवण्याची सगळी जबाबदारी बीएला जाणाऱ्या मूठभर विद्यार्थ्यांच्या डोक्यावर आपण टाकलेली आहे. ही वस्तुस्थिती आहे.

काही थोडे लोक मराठीचे अध्ययन करतात. बाकीच्यांना मराठीशी काही देणेघेणे नाही. ही वस्तुस्थिती भाषेच्या, साहित्याच्या संस्कृतीच्या आणि त्या विद्यार्थ्यांच्या जीवनाच्याही दृष्टीने चांगली नाही. भाषेपासून, साहित्यापासून मुलांना तोडून टाकता आणि मराठी भाषेचे काय होईल, मराठी साहित्याचे काय होईल अशी चिंता करता. ही विसंगती आहे. मी असे सुचवतो आहे की आपण अन्य विद्याशाखांमध्येही साहित्य हा विषय ठेवावा.

प्रमाण मराठीचा जीवनाच्या सर्व क्षेत्रात कुशल वापर आणि मराठीच्या बोलीचे संवर्धन या दोन्ही बाबतीत शासनाच्या भाषाविभागाने भरीव काम केले पाहिजे. महाराष्ट्रात अनेक बोली आहेत. वऱ्हाडी, नागपुरी, हळबी, अहिराणी, डांगी, मालवणी, कडाळी, झाडी, डांगणी, माणदेशी मराठवाडी, भिलोरी, पोवारी, गोंडी, इत्यादी.

आजच्या मराठी साहित्यात या विविध बोलींमधले लेखन केले जात आहे. कथा, कादंबरी, आत्मचरित्र, कविता या साहित्यप्रकारांतील लेखनात बोलींचा वापर मोठ्या प्रमाणात होताना दिसतो. दलित, भटक्या विमुक्त, आदिवासी जाती-जमातीमधून आलेल्या लेखकाच्या स्वकथनांतून त्या त्या प्रदेशाशी, व्यवसायाशी, समाजगटाशी निगडित बोली आलेली आहे.

उदाहरणार्थ लक्ष्मण माने यांच्या उपरामध्ये कैकाडी बोली, रुस्तुम अचलखांब यांच्या गावकीमध्ये जालना परिसरातील बोली, दादासाहेब मल्हारी मोरे यांच्या गबाळमध्ये मिरज-जत परिसरातील कुडमुडे जोशी जमातीची बोली, शरणकुमार लिंबाळे यांच्या अक्करमाशीत अक्कलकोट परिसरातील बोली, लक्ष्मण गायकवाड यांच्या उचल्यामध्ये लातूर परिसरातील संतामुच्चर जमातीची बोली, रावजी राठोड यांच्या तांडेलमध्ये नांदेड परिसरातील बंजारा बोली, भगवान इंगळे यांच्या ढोरमध्ये जामखेड परिसरातील बोली, योगीराज बागूल यांच्या पाचटमध्ये वैजापूर परिसरातील ऊसतोडीच्या कामगारांची बोली अशा कितीतरी बोली मराठी साहित्यात आलेल्या आहेत.

बोलीबरोबर ती बोली बोलणाऱ्यांची संस्कृतीही अशा कथनांतून व्यक्त होते. या बोलीचा आणि प्रमाण मराठीचा सांधा जोडण्याचे काम विद्यापीठातील मराठीचे, समाजशास्त्राचे आणि सांस्कृतिक मानवशाखाचे प्राध्यापक करू शकतात; नव्हे, ते त्यांनी करावे असे मी सुचवतो.

भारतासारख्या कृषिप्रधान देशावर आर्थिक जागतिकीकरणाचा किती गंभीर विपरीत परिणाम होतो याविषयी वंदना शिवा यांनी लिहिले आहेः आर्थिक जागतिकीकरणामुळे बीज-बियाणे उद्योगाचे केंद्रिकरण, जागतिक व्यापारी प्रतिष्ठानांचा (ग्लोबल कार्पोरेशन्स) कृषिव्यवसायात प्रवेश, कीटकनाशकांचा वाढता वापर, वाढत चाललेली कर्जे, निराशा, त्यामुळे लहान शेतकऱ्यांच्या होणाऱ्या आत्महत्या या गोष्टी घडत आहेत.

भांडवल गुंतवणारी कार्पोरेट - नियंत्रित कृषिव्यवस्था अस्तित्वात येते आहे. अशा स्थितीत गरीब शेतकरी टिकून राहणे अशक्य झाले आहे. जागतिकीकरणात निर्यातीला प्राधान्य आहे. त्यामुळे शेतकरी अन्नधान्य पिकवण्याऐवजी निर्यात करता येईल अशी पिके घेऊ लागले आहेत. उत्पादनखर्चात वाढ झाल्यामुळे कर्ज काढण्याची प्रवृत्ती वाढीस लागली. पाहिजे तसे उत्पन्न झाले नाही किंवा भाव मिळाले नाहीत तर शेतकरी बुडतो, तो वैफल्याने ग्रासला जातो.

जागतिकीकरणाच्या अवस्थेत इंग्रजीसारख्या एकाच भाषेत संज्ञापन आणि ज्ञानव्यवहार होत असेल तर इतर भाषा बोलणाऱ्यांचे आणि त्यांच्या भाषांचे भवितव्य काय हा प्रश्न उपस्थित होणे अपरिहार्य आहे. इंग्रजी ही आंतरराष्ट्रीय व्यापाराची, राजकारणाची, आंतरराष्ट्रीय संबंधांच्या व्यवस्थापनाची, ज्ञानाची, अनुवादाची, संगणकाची, इंटरनेटची आणि मोबाईल फोनची, भाषा आहे. ती ग्लोबल लँग्वेज आहे. थोडक्यात ती जागतिकीकरणाची भाषा आहे.

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत इंग्रजी भाषेला अत्यंत महत्त्व आलेले आहे. पूर्वी ब्रिटिश वसाहती असलेल्या देशांतच नव्हे तर जगाच्या सर्वच खंडांतील देशांमध्ये ती शिकली, बोलली, लिहिली जाते आहे. तथापि पूर्वी वसाहती असलेल्या देशांवर तिचा अधिक प्रभाव आहे. घानासारख्या आफ्रिकन प्रजासत्ताकात इंग्रजी भाषेला प्रथम क्रमांकाचे स्थान आहे. राज्यकारभाराची, व्यापाराची, शिक्षणाची तीच भाषा आहे.

जागतिकीकरणाच्या अर्थकारणामुळे विकसनशील देशांच्या अर्थकारणावर जसे विपरीत परिणाम होत आहेत तसेच ते भाषांच्या बाबतीतही होतील का अशी चिंता अनेक देशांतील भाषातज्ज्ञ व्यक्त करीत आहेत. इंग्रजीमुळे राष्ट्रीय भाषांचे, प्रादेशिक भाषांचे, बोलींचे अस्तित्व मिटून जाईल काय या प्रश्नाने जगभरातील विचारवंत अस्वस्थ झालेले आहेत. कारण तशी काही चिन्हे वास्तवात दिसत आहेत.

भारतामध्ये भाषांची विविधता आहे. आसामी, उड़िया, उर्दू, कन्नड, काश्मिरी, कोकणी, गुजराती, डोगरी, तमिळ, तेलुगू, नेपाली, पंजाबी, बंगाली, बोडो, मणीपुरी, मराठी, मलयालम, मैथिली, संथाली, संस्कृत, सिंधी, हिंदी या प्रमुख भाषा आहेत. हिंदी ही उत्तरप्रदेश, उत्तरांचल, छत्तीसगड, झारखंड, बिहार, मध्यप्रदेश, राजस्थान, हरयाणा, हिमाचल प्रदेश, आणि राजधानी दिल्ली व केंद्रशासित प्रदेश यांची अधिकृत भाषा आहे.

इंग्रजी भाषेचा सहभाषा म्हणून स्वीकार केलेला आहे. राष्ट्रीय पातळीवर इंग्रजी आणि हिंदी या भाषांना विशेष महत्त्व आहे. प्रादेशिक भाषांना राज्यभाषेचा दर्जा असला तरी सर्वच राज्यांमध्ये इंग्रजी ही भाषा सार्वजनिक व खासगी क्षेत्रांमध्ये उपयोगात आणली जाते. या मान्य प्रादेशिक भाषांखेरीज अन्य भाषाही आहेत महाराष्ट्रात मराठीच्या बोलींखेरीज भिली, गोंडी, कोरकू, वारली या भाषा आहेत. या मराठीच्या बोली नसून स्वतंत्र भाषा आहेत आणि त्या भाषांमध्ये त्या भाषक समुहांचे सांस्कृतिक संचित आहे.

आज आपण सगळेच पूर्वी न अनुभवलेल्या संक्रमणाच्या अवस्थेतून जात आहोत. सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक, सामाजिक क्षेत्रांमध्ये उत्पन्न झालेल्या संभ्रमाच्या मुद्रा पाहतो आहोत. गावे, शहरे बदलत आहेत. पुष्कळदा असे वाटते की आपण अवाढव्य अशा बाजारपेठेतून हिंडतो आहोत. आजच्या या स्थितीत संस्कृती, भाषा, साहित्य यांचे भवितव्य काय या प्रश्नाने आपण अस्वस्थ आहोत. याशिवायही अनेक प्रश्न आपल्या मनात आहेत.

स्पेस मिळाली की आपण प्रश्न मांडायला लागतो. काही वेळा आपल्याला अशी स्पेस तयार करावी लागते. झाडीपट्टी रंगभूमी ही अशा स्पेसचे उत्तम उदाहरण आहे. उर्वरित महाराष्ट्राला कितपत कल्पना आहे कोण जाणे. झाडीपट्टीची दंडार ही परंपरेने चालत आलेली लोककला आहे. दंडार म्हणजे हातात डहाळी घेऊन केलेला नाच असा एक अर्थ दिलेला आहे. म्हणजे हे सृजनाचे नृत्य आहे. जंगलात, निसर्गात राहणाऱ्या लोकांचा निर्मितीचा उत्सव, आता सर्वत्र पसरलेल्या जंगलात कार्पोरेट हत्ती शिरून उच्छाद मांडायला सिद्ध झालेले आहेत.

साम्राज्यवाद नष्ट झाला आहे. परंतु साम्राज्ये आपल्या डोळ्यांसमोर आकार घेत चालली आहेत. जागतिकीकरण हे या साम्राज्याचे नाव आहे. या साम्राज्यात आधुनिकता आणि समृद्धी यांची आमिषे दाखवली जातात, परंतु प्रत्यक्षात सामाजिक दुभंगलेपण आणि सांस्कृतिक मागासलेपण यांचे पोषण केले जाते.

व्यक्तीचे बाहेरच्या जगाशी असलेले संबंध, बाजारपेठेचा प्रभाव आणि त्याच्याशी निगडित उपभोक्तावादी संस्कृती आणि धार्मिकता व धर्मजातीवाद यांचा उदय या तीन गोष्टींचा अनेक विचारवंतांनी परामर्ष घेतला आहे. व्यक्तीच्या दृष्टीने सामाजिक प्रश्न महत्त्वाचे राहिलेले नाहीत. सार्वजनिकतेच्या ठिकाणी वैयक्तिकता आलेली आहे. व्यक्ती स्वतःच्या प्रश्नांमध्ये जास्त गुंतून गेली आहे. बाजारपेठेचे स्वरूप बदलले आहे. पूर्वी अप्राप्य अशा वस्तु व्यक्तीच्या हाताशी आलेल्या आहेत असा आभास तयार केला जातो. परंतु व्यक्तीची वास्तविक स्थिती आणि तिच्या निवडीला केले जाणारे आवाहन यांत विसंगती तयार होते. वस्तूंमध्येच सर्वस्व आहे. खरा आनंद आहे असे वाटणे. वस्तूंनी झपाटले जाणे अशी एक मानसिक अवस्था तयार होते. आर्थिक क्षमता नसल्याने बहुसंख्यांना त्या मिळवता येत नाहीत.

सर्वसामान्य माणसांच्या सुखदुःखाची हायस्ट्रीट फिनिक्सच्या मोराला काही पर्वा नसते तो चमचम दिव्यांचा पिसारा फुलवून दिमाखात उभा असतो. जयंत पवार यांची ह्यफिनिक्सच्या राखेतून उठला मोरह्न ही कथा जागतिकीकरणावरचे, मुक्त बाजारपेठेवरचे नवमध्यमवर्ग आणि कनिष्ठवर्ग यांच्यात पडलेल्या दरीवरचे एक प्रखर भाष्य आहे.

जागतिकीकरण ही भिन्न भिन्न आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक विचारप्रवाहांना सामावून घेणारी संज्ञा आहे. जागतिकीकरण ही एक अवस्था आहे आणि सिद्धांतही आहे. वर्तमानकाळात जागतिकीकरण या शब्दात विविध अर्थच्छटा दडलेल्या आहेत.

उदाहरणार्थः मुक्त बाजारपेठ, आर्थिक उदारीकरण, राजकीय-आर्थिक-सांस्कृतिक जीवनावर पाश्चात्य धारणांचा प्रभाव, पश्चिमीकरण किंवा अमेरिकीकरण, माहिती तंत्रज्ञानाचा प्रसार, इंटरनेट क्रांती, जागतिक एकात्मता, इत्यादी.

जागतिकीकरणाची ही अवस्था एक अपूर्ण अवस्था आहे. भांडवलशाहीचा हा पुढचा टप्पा आहे. वाफेवर चालणारी जहाजे, टेलिग्राफ, टेलिफोन, रेल्वे ही भांडवलशाहीची संचार साधने होती.

प्रगत भांडवलशाहीला संगणक, उपग्रहांवर अधारित दृक-श्राव्य माध्यमे, भ्रमणध्वनी, द्रुत आंतरराष्ट्रीय विमानवाहतूक ही संचार-संज्ञापन साधने मिळालेली आहेत. समाजवैज्ञानिकांच्या मते जागतिकीकरण या संज्ञेत सामाजिक अस्तित्वाशी निगडित स्थल आणि काल या संकल्पनांतील मूलभूत बदलांचा निर्देश आहे.

-------------

**वसंत आबाजी डहाके**
**ज्येष्ठ साहित्यिक,**
**अमरावती.**




# सारे काही मराठीसाठी

**९८ वे**
**अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, दिल्ली**
**२०२५**

**: संकलन :**
**विजय राऊत**
**विभागीय माहिती कार्यालय, अमरावती.**

**यावर्षी ९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन राजधानी नवी दिल्ली येथे होत आहे. या आधी नवी दिल्ली येथे ७२ वषार्पूर्वी ऑक्टोबर महिन्यात ५४ वे साहित्य संमेलन झाले होते. तेव्हा, महाराष्ट्र राज्याची निर्मितीही झाली नव्हती, आणि अ. भा. मराठी साहित्य महामंडळही अस्तित्वात नव्हते. या ५४ व्या साहित्य संमेलनाचे उद्घाटन तत्कालीन पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरु यांनी केले होते. अध्यक्ष होते तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, आणि स्वागताध्यक्ष होते काकासाहेब गाडगीळ. त्यानंतर दिल्लीत साहित्य संमेलन होत आहे ते यंदाच. या आधी तब्बल बावीस वेळा महाराष्ट्राबाहेर साहित्य संमेलने झाली आहेत. यंदाही हे संमेलन अनेक कारणांसाठी विशेष ठरणार आहे. केंद्र सरकारकडून मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर दिल्ली येथे होणारे हे पहिले साहित्य संमेलन आहे. यामुळे हे संमेलन ऐतिहासिक असेल. हा सोहळा मराठी भाषिक, साहित्य प्रेमींसाठी एक अभिमानास्पद क्षण ठरणार आहे. यामुळे संपूर्ण भारतभर आणि परदेशात विखुरलेल्या मराठी जनामनास एकत्र येण्याची संधी मिळणार आहे. या संमेलनामुळे मराठीचा लौकिक अधिक वृद्धिंगत होईल. विशेषतः पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणारे उद्घाटन हा मराठी भाषिकांसाठी अभिमानाचा क्षण असेल. अशा या विशेष संमेलनानिमित्त मराठी भाषेच्या समृध्दतता व संवर्धनासाठी कार्यरत असणाऱ्या संस्थाविषयी माहिती देणारा लेख...**

----------------

मराठी भाषा विभागांतर्गत भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळ व राज्य मराठी विकास संस्था अशी ४ कार्यालये कार्यरत आहेत. या चार कार्यालयांकडून मराठी भाषा आणि साहित्य यांच्या संवर्धनासाठी विविध उपक्रम राबवण्यात येतात. या सर्व उपक्रमांना गती देण्यात आली आहे.

**राज्य मराठी विकास संस्था, मुंबई.**

पुस्तकांचे गाव भिलार या प्रकल्पांतर्गत सुरुवातीस २५ घरांमधून प्रत्येकी ५०० पुस्तके वाचक/ पर्यटकांसाठी उपलब्ध करून देण्यात आली होती. लोकसहभागातून सुरू केलेल्या या प्रकल्पास वाचकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत असल्याने घरांच्या संख्येत वाढ करण्यात येत आहे. सध्या येथे साहित्यिक व भाषिक उपक्रमांचे नियमित आयोजन करण्यात येत आहे.

या उपक्रमाकरिता वाचकांसाठी निवास व्यवस्था, रस्ते, वाहनतळ, सार्वजनिक प्रसाधनगृह तसेच खुले प्रेक्षागृह इत्यादी पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने कार्यवाही सुरू आहे.

राज्य मराठी विकास संस्थेकडून अमराठी भाषिकांसाठी अध्यापन साधने विकसित करण्यासाठी मुंबई विद्यापीठाच्या जर्मन विभागाच्या पुढाकाराने 'मायमराठी' हा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. या प्रकल्पांतर्गत सन २०१८ मध्ये ३८ लाख रुपये अर्थसहाय्य वितरित करण्यात आले होते. या अनुदानात सद्यस्थितीत भरीव वाढ करण्यात आली आहे.

मराठी बोलींचे प्रतिमांकन हा प्रकल्प डेक्कन कॉलेज, पुणे यांच्या साहाय्याने हाती घेण्यात आला असून यामध्ये ६० बोली भाषेचा समावेश करण्यात आला आहे.

**दासोपंतकृत गीतार्णव शब्दार्थ- संदर्भकोश** : नाथपंचकातील एक महत्वाचे कवी दासोपंत यांनी लिहिलेली गीता टीका म्हणजेच गीतावर्ण हा ग्रंथ होय. या साहित्यकृतीची माहिती मराठी वाचकांना व्हावी, याकरिता हा प्रकल्प हाती आला आहे.

**भाषा संचालनालय, मुंबई**

भाषा संचालनालयाने दैनंदिन प्रशासन व न्याय व्यवहारात सातत्याने उपयोगी होणाऱ्या अ) कार्यदर्शिका ब) प्रशासन वाक्यप्रयोग क) शासन व्यवहार कोश ड) न्याय व्यवहार कोश या भ्रमणध्वनी ॲपचे काम पूर्ण केले असून वरील चार कोषांमध्ये सुमारे ८६ हजार मराठी/इंग्रजी शब्दांचा समावेश आहे.

परिभाषा कोश अद्यावतीकरण करण्याचे काम सातत्याने सुरू असते.

शासन व्यवहार कोश, कृषिशास्त्र, अर्थशास्त्र, तत्वज्ञान आणि तर्कशास्त्र तसेच शिक्षणशास्त्र परिभाषा कोश या कोषांच्या अद्यावतीकरणाचे काम पूर्ण झाले आहे. आतापर्यंत सुमारे ३४ परिभाषा कोश/ शब्दकोश तसेच शासन मार्गदर्शक पुस्तकांची निर्मिती केली आहे.

**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.**

नवीन लेखन प्रकल्प

मराठी भाषेत मौलिक व वैचारिक विषयांवर नाविन्यपूर्ण लिखाण करण्याकरिता मंडळाकडून २० नवीन लेखन प्रकल्प हाती घेतले आहेत. ते पुढीलप्रमाणे आहेत. १) नाट्य संज्ञाकोष, २)मराठी नाटक आणि रंगभूमीचा समग्र इतिहास ३) महाराष्ट्राच्या सामाजिक- सांस्कृतिक स्थित्यंतरांचा इतिहास ४) महाराष्ट्र दृश्यात्मक कलांच्या परंपरांचा आढावा- बृहद्ग्रंथ प्रकल्प ५) १९ व्या व २० व्या शतकातील अध्यात्म मार्गदर्शकाचा बोध, ६) मराठी सारस्वतांचे चित्रचरित्र ७) सत्यशोधकांचे अंतरंग ८) गुरुवर्य कृ. अ. केळुसकर यांचे समग्र वाङमय, ९) सुफी तत्वज्ञान सखोल विश्लेषण- बृहद्ग्रंथ १०) भारतातील सार्वजनिक ग्रंथालय चळवळीची ऐतिहासिक वाटचाल- एक दृष्टिक्षेप ११) महाराष्ट्राबाहेरील मराठी माणसांच्या कामगिरीचा समग्र आणि सम्यक इतिहास, १२) अभंगसेतू- संत वचनांचे अनुवाद, १३) अक्षर बालवाङमय : संहिता शोध व बृहद् संदर्भग्रंथ, १४) नक्षत्र निलनभीचे - समग्र बालकवी, १५) महाराष्ट्राच्या प्रयोगात्मक लोककला : परंपरा आणि नवता (१८५० ते २०१६), १६) कविवर्य नामदेव ढसाळ यांचे समग्र वाङमय-बृहद्प्रकल्प, १७) नागेश विनायक बापट यांचे समग्र वाङमय, १८) मराठीतील बालसाहित्य : इतिहास लेखन आणि समीक्षा संपादन, १९) आधुनिक महाराष्ट्र : अन्वेषणात्मक कालपट, २०) महाराष्ट्रातील नाथ, महानुभाव, वारकरी, दत्त, गाणपत्य, चैतन्य, लिंगायत, आनंद व अन्य संप्रदायांच्या मध्ययुगीन वाङमयातील अप्रकाशित व असंग्रहित स्फुट कवितांचे प्रकाशन. दरवर्षी २७ फेब्रुवारीला, मराठी भाषा गौरव दिन समारंभाच्या वेळी या ग्रंथाचे प्रकाशन करण्यात येते.

**अनुदानात वाढ :**

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ व त्यांच्या ४ घटक संस्था तसेच कोकण मराठी साहित्य परिषद, रत्नागिरी व दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, कोल्हापूर या ७ साहित्य संस्थांच्या साहित्यिक उपक्रमांना प्रोत्साहन देण्याकरिता आतापर्यंत या संस्थांना दरवर्षी प्रत्येकी ५ लाख रुपये इतके अनुदान देण्यात येत होते. या अनुदानात वाढ करण्यात आली असून आता प्रत्येकी १० लाख रुपये इतके अनुदान दिले जाते.

**महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई.**

मराठी विश्वकोशाचे १ ते २० या सर्व खंडाचे काम पूर्ण झाले असून यामध्ये सुमारे १८ हजार ५७ इतक्या नोंदीचा समावेश आहे. हा विश्वकोश शासनाच्या संकेतस्थळावर तसेच कार्ड, पेन ड्राईव्हच्या स्वरूपात वाचकांना उपलब्ध करून देण्यात आला आहे.

या विश्वकोशाच्या नोंदीचे अद्यावतीकरण करण्याकरिता महाराष्ट्रातील विद्यापीठे, शैक्षणिक व संशोधन संस्था यांची मदत घेण्यात येत असून विषयनिहाय विविध ४७ ज्ञानमंडळांची स्थापना करण्यात आली आहे. या ज्ञामंडळांकडून आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून ऑनलाईन पद्धतीने विश्वकोशांच्या नोंदींचे अद्यावतीकरण करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. आधुनिक कार्य पद्धतीने विश्वकोशातील नोंदी अद्यावत करण्यासंबंधी सर्व संबंधितांना विश्वकोश मंडळाकडून मार्गदर्शन करण्यात येते त्याकरिता वेळोवेळी कार्यशाळेचे आयोजन करण्यात येते.

●●●●●

# वादाशिवाय व्हावे साहित्य संमेलन !

९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन २१, २२ आणि २३ फेब्रुवारी रोजी दिल्ली येथे मराठी भाषेतील ज्येष्ठ लेखिका तारा भवाळकर यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे.

या संमेलनाची तयारी पूर्ण झाली असून साहित्य रत्नांचे स्वागत करायला देशाची राजधानी सज्ज झाली असून या संमेलनाची कार्यक्रम पत्रिकाही नुकतीच जाहीर करण्यात आली आहे. यावेळच्या साहित्य संमेलनाचे वैशिष्ट म्हणजे या साहित्य संमेलनाचे उदघाटन देशाच्या पंतप्रधानांच्या हस्ते होणार आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे २१ फेब्रुवारी रोजी ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे उदघाटन करणार असून यावेळी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे उपस्थित राहणार आहे. हे संमेलन दिल्लीतील ताल कटोरा स्टेडियमवर होणार असले तरी उदघाटन सोहळा मात्र दिल्लीतील विज्ञान भवनात होणार आहे.

या साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष देशाचे माजी कृषिमंत्री शरद पवार हे असून या साहित्य संमेलनात मोठ्या संख्येने राजकीय नेते उपस्थित राहण्याची शक्यता आहे. राजकीय नेत्यांसोबत साहित्य रसिकही या संमेलनाला मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत केवळ महाराष्ट्रातूनच नव्हे तर देशातील अनेक राज्यातून मराठी माणूस या साहित्य संमेलनाला हजेरी लावेल असा विश्वास आयोजकांना आहे.

दिल्लीत होणारे हे साहित्य संमेलन दिल्लीत राहणाऱ्या मराठी भाषिकांसाठी तर पर्वणीच ठरणार आहे. दिल्लीत बहुसंख्य मराठी भाषिक आहेत ते साहित्य संमेलनाला हजर राहणार यात शंका नाही त्यामुळेच दिल्लीत होणारे हे साहित्य संमेलन ऐतिहासिक ठरेल यात शंका नाही.

या साहित्य संमेलनात विविध विषयांवर परिसंवाद, चर्चा तसेच भरगच्च कार्यक्रम होणार आहे. संमेलनाच्या अध्यक्षा तारा भवाळकर यांच्या भाषणाकडे साहित्य वतुर्ळाचे लक्ष लागून राहिले आहे. संमेलनात सांस्कृतिक कार्यक्रमाची रेलचेल असणार आहे तसेच अनेक ठराव करण्यात येणार आहे.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर होणारे हे पहिलेच साहित्य संमेलन असल्याने या साहित्य संमेलनाचे वेगळे महत्व आहे त्यामुळेच हे साहित्य संमेलन कोणत्याही वादाशिवाय पार पडेल अशी अपेक्षा साहित्य रसिक व्यक्त करीत आहेत.

साहित्य संमेलन आणि वाद हे समीकरण गेल्या काही वषार्पासून बनले आहे. हे समीकरण यावेळी तरी बदलावे, या साहित्य संमेलनाला कोणत्याही वादाचे गालबोट लागू नये अशी अपेक्षा साहित्य रसिक व्यक्त करीत आहेत. अजून तरी या साहित्य संमेलनाविषयी कोणताही वाद उत्पन्न झाला नाही ही आनंदाची बाब आहे. असेच वादाविना साहित्य संमेलन पार पडावे.

साहित्य संमेलन म्हणजे सारस्वतांचा मेळा वारकरी ज्या प्रमाणे पंढरपूरची वारी न चुकता करतात त्याप्रमाणे साहित्यिकही न चुकता संमेलनाला हजेरी लावतात. साहित्य रसिकही साहित्यिकांचे विचार विचार, चर्चा ऐकण्यासाठी आतुर असतात पण दरवेळी नको त्या विषयावर वाद होतो आणि त्या वादाच्या छायेतच साहित्य संमेलन पार पडते. त्यामुळे साहित्य संमेलनाचा मूळ उद्देशच भरकटतो.



**श्याम ठाणेदार**
**दौंड, जिल्हा पुणे.**
**९९२२५४६२९५**

माध्यमात देखील त्या वादावरच चर्चा होते त्यामुळे साहित्य रसिकांचा मोहभंग होतो. त्यामुळे वादा शिवाय साहित्य संमेलन पार पडेल याची दक्षता आयोजकांनी घ्यावी. याशिवाय संमेलन आणखी लोकप्रिय होऊन तरुणाई या साहित्य संमेलनाकडे कशी आकर्षित होईल याचाही विचार आयोजकांनी करावा.

आजचे तरुण सोशल मीडियाचा अधिकाधिक वापर करतात. तरुण वर्गाला साहित्य संमेलनामध्ये आकर्षित करायचे असेल आयोजकांनी साहित्य संमेलनाला समाज माध्यमांशी जोडावे. आयोजकांनी साहित्य संमेलनाचे सर्व अपडेट फेसबुक, इंस्टाग्राम, व्हॉट्सअप, ट्विटर या सारख्या समाज माध्यमांवर द्यावीत म्हणजे तरुणाईत देखील साहित्य संमेलन लोकप्रिय होईल.

देशाची राजधानी असलेल्या दिल्लीत होत असलेल्या हे ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन लोकप्रिय होऊन कोणत्याही वादाशिवाय पार पडेल ही अपेक्षा . ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला मनापासून शुभेच्छा!

●●●●●

# कुंभीवाघोलीत आढळल्या बिबट्याच्या पाऊलखुणा

## वन विभागाकडून उपाय योजना ऐवजी मिळाली ताकीद

**महासागर प्रतिनिधी**

**पथ्रोट( दि.19 )**– गावापासून सहा किलोमीटर अंतरावर असलेल्या कुंभीवाघोली येथील परिसरात बिबट्याच्या पाऊलखुणा आवळल्याने रहिवासी व भक्तगण भयभीत झाले आहेत. भुलेश्वरी मंदिरावर बिबट्याचे आगमन झाल्यानंतर त्याची माहिती वन विभागाच्या अधिकाऱ्यांना देण्यात आली होती. परंतु त्यावर उपाययोजना करण्याऐवजी त्यांनी उलट ग्रामस्थांनाच प्रचार न करण्याची ताकीद दिल्याने तेथील रहिवासी व मंदिरावर येणाऱ्या भक्तगणांमध्ये भीतीचे वातावरण पसरलेले आहे.

भुलेश्वर मंदिर परिसरात महादेवाचे मंदिर असून मंदिर परिसरात धरण व त्याला लागूनच मोठा जंगल परिसर आहे. त्या ठिकाणी दररोजच परिसरातील भक्तगण मोठ्या संख्येने दर्शनाला येतात. तर महाशिवरात्रीनिमित्त तेथे दोन दिवसाची मोठी यात्रा भरते. अशावेळी यात्रेला काही दिवस शिल्लक असतानाच बिबट्यासारख्या हिंस्र प्राण्याने त्या ठिकाणी आपली



उपस्थिती दर्शविल्याने सर्वांच्या चिंतेत भर पडली आहे. मागील काही दिवसापासून या संपूर्ण जंगल परिसराच्या भोवतालच्या शेत शिवारामध्ये गाय, वासरू व इतर पाळीव प्राण्यांची त्याने शिकार केल्याचे उदाहरण ताजे आहे. याबाबतची संपूर्ण माहिती वन विभागाकडे आहे. त्यांनी पंचनामा करताना बिबट्याच्या अस्तित्वाची खात्री केलेली होती. परंतु त्यांच्याकडून यासंदर्भात काहीच उपाययोजना राबविल्या न गेल्याने हळूहळू बिबट्याचे आगमन हे गाव वस्तीकडे होताना दिसून येत आहे.

> वन विभागाची चमू पाठवून शहानिशा करून घेऊ, त्यानंतर या बाबत काय उपाययोजना राबविता येईल त्यानुसार निर्णय घेण्यात येईल.
>
> **दिनेश वाळके,**
> **वनपरिक्षेत्र अधिकारी,**
> **परतवाडा**

मंदिर परिसरात त्याच्या पायाचे ठसे स्पष्टपणे आढळले आहेत. त्याचे फोटो काढून तेथील ग्रामस्थांनी वन विभागाच्या अधिकाऱ्यांना पाठवून माहिती दिली. त्यावर तो जंगलाचा प्राणी आहे. त्याच्या आगमनाची चर्चा करू नका; अन्यथा आम्हाला नागरिकांकडून त्रास सहन करावा लागेल. अशा प्रकारची ताकीदच वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी ग्रामस्थांना दिल्याने परिसरात राहणारे नागरिक प्रचंड घाबरले आहे. अशावेळी वन विभागाने यात्रेनिमित्त कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही याची दखल घेत ठोस उपाययोजना करावी अशी मागणी कुंभी वाघोली गोंडवाघोली व पथ्रोट येथील गावकऱ्यांनी केली आहे.

# अमरावतीमध्ये जीबीएस ची एंट्री

### 65 वर्षीय रुग्ण आढळला पॉझिटिव्ह

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.19 )** – अमरावतीमध्ये जीबीएस आजाराने एंट्री केली असून जीबीएसचा पहिला रुग्ण आढळला (दि.19)आहे. त्यामुळे अमरावतीमध्ये भीतीचे वातावरण आहे. पुणे, सोलापूर, मुंबई, नागपूर, धुळेनंतर आता अमरावतीतही जीबीएस आजाराने चिंता वाढवली आहे. या आराजाचे एकापाठोपाठ एक रुग्ण आढळत आहे. जीबीएसची लागण झालेल्या रुग्णांची संख्या देखील झपाट्याने वाढत असून मृतांचा आकडा देखील वाढत आहे.



पुण्यावरून गावी आलेला 65 वर्षीय रुग्ण जीबीएस पॉझिटिव्ह आला आहे. अमरावतीच्या जिल्हा सामान्य रुग्णालयात त्याच्यावर उपचार सुरू आहेत. या रुग्णाची प्रकृती गंभीर आहे. त्यामुळे त्यांच्यावर आयसीयूमध्ये उपचार सुरू आहेत. अमरावती जिल्ह्यातील एका गावातील ही व्यक्ती 12 दिवसांपूर्वी पुण्याहून प्रवास करून आल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे. मात्र या पहिल्या जीबीएस रुग्णामुळे जिल्ह्यातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पाणी उकळून व गाळून घ्यावे. उघड्यावरील व शिळे अन्न खाणे टाळावे. अचानकपणे हातापायाच्या स्नायूंमध्ये अशक्तपणा जाणवल्यास डॉक्टरांचा सल्ला घ्यावा किंवा जवळील शासकीय रुग्णालयात जावे. या प्रकारे या आजारावर काळजी घेणे आवश्यक असते.

### अशी आहेत 'जीबीएस' ची लक्षणे

बरा न होणारा ताप, सर्दी, खोकला, सातत्याने अशक्तपणा, हात, पाय, चेहऱ्यावरील स्नायूंना अर्धांगवायूचा झटका येणे, छातीमध्ये प्रादुर्भाव होऊन श्वास घेण्यास त्रास होणे, बोलण्यासह अन्न गिळण्याचा त्रास होणे, रक्तसंसर्ग होऊन फुफ्फुसात गुठळ्या अन् हृदयविकाराचा झटका येणे, न्यूरोलॉजिकल गुंतागुंतीत वाढ, जास्त दिवस डायरियाचा त्रास होणे अशी काही लक्षणे या आजाराची आहे. जीबीएस म्हणजेच गुलेन बॅरी सिंड्रोममध्ये बाहेरील विषाणू किंवा जिवाणूंवर हल्ला करणारी शरीरातील रोगप्रतिकारशक्तीच मज्जासंस्थेवर हल्ला करते. त्यामुळे मेंदूकडून शरीरातील इतर अवयवांना मिळणारे संकेत कमी होतात, असे या आजाराचे स्वरूप आहे. स्नायू कमकुवत होऊ शकतात. हाता–पायातील संवेदना कमी होऊ शकते. गिळताना किंवा श्वास घेण्यास त्रास होऊ शकतो. प्रौढांमध्ये आणि पुरुषांमध्ये ही समस्या अधिक असून, सर्वच वयोगटांतील लोकांना याचा त्रास होऊ शकतो.

> रूग्ण आढळला असून त्याची प्रकृती स्थिर आहे.जिल्हा सामान्य रूग्णालयात त्याच्यावर उपचार सुरू आहे. पुढील तपासणीसाठी नमुने घेण्यात आले आहे.
>
> **डॉ.दिलीप सौंदळे,**
> **जिल्हा शल्य चिकित्सक, अमरावती.**

# हरभरा काढताना थ्रेशरमध्ये पाय अडकून शेतमजुराचा मृत्यू

### बेंबळा खुर्द येथील घटना

**महासागर प्रतिनिधी**

**दर्यापूर ( दि.19 )**– हरभरा काढताना थ्रेशरमध्ये पाय अडकून शेतमजुराचा मृत्यू झाल्याची घटना खल्लार जवळील बेंबळा खुर्द शेत शिवारात (दि.19) घडली आहे. अमोल अनील डिके (वय 37,रा.खल्लार) असे मृतक शेत मजुराचे नाव आहे.

बुधवारी सकाळी 11 वाजताच्या सुमारास बेंबळा खुर्द मध्ये अनिल कळंके यांच्या शेतात हरबरा पीक काढणे सुरु होते. मृतक अमोल हा हरभऱ्याच्या गंजीवर चढून थ्रेशर मध्ये हरभरा टाकत होता. यावेळी हरभऱ्याची गंजी उंच असताना अचानक शेतमजुराचा पाय घसरून तो थ्रेशर मध्ये पडला.

यावेळी थ्रेशर चालू होते. अमोलचा डावा पाय थ्रेशरच्या पट्ट्यात अडकला होता. त्याच्या पायाचे तुकडे झाले होते. त्याला रक्तबंबाळ अवस्थेत उपस्थित मजुरांनी स्थानिक रूग्णालयात नेले. मात्र प्रकृती गंभीर असल्याने त्याला तातडीने अमरावती येथील



रुग्णालयात नेतांना वाटेतच त्याचा मृत्यू झाला.

सदर थ्रेशर अ.वाहेद (रा.खल्लार) यांचे असून मृतक अमोल डिके हा त्यांच्याकडे मजुरी करत होता. या थ्रेशरवर एकूण तीन जण काम करत होते. मृतक अमोल डिके यास दर्यापूर उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदनासाठी आणण्यात आले.

यावेळी जिल्हा परिषद सदस्य तथा शिवसेना नेते सुनील डिके यांच्यासह आप्तस्वकीय व गावकरी उपस्थित होते. मृतक अमोल डिके याच्या पश्चात तीन वर्षाचा मुलगा,एक भाऊ, आई–वडील व पत्नी असा परिवार असून त्यांच्या घरची आर्थिक परिस्थिती हलाखीची आहे. दरम्यान या घटनेने सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.



# अभियंता कार्यालयात कंत्राटदाराचे धरणे आंदोलन

## उद्या मुख्य अभियंता यांना घालणार घेराव

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.19 )**– मागील अनेक वर्षापासून प्रलंबित असलेली कंत्राटदारांची देयके देण्यासाठी अमरावती कंत्राटदार असोसिएशनने अधीक्षक अभियंता कार्यालयात धरणे आंदोलन केले. तात्काळ निर्णय न घेतल्यास 21 फेब्रुवारीला मुख्य अभियंता यांना घेराव घालण्याचा इशारा यावेळी देण्यात आला.

अमरावती जिल्हा कंत्राटदार संघटनेद्वारा वारंवार शासनास कंत्राटदारांच्या देयकाच्या मागणीकरिता निवेदन देण्यात आले आहे. मात्र, शासन नेहमीप्रमाणे हट्टी स्वभाव सोडण्यास तयार नाही व या वेळेससुध्दा सरासरी 5 टक्के रक्कम वितरीत केली आहे. ती खूपच तोकडी असल्यामुळे तसेच एका दीर्घ कालावधीनंतर शासनाने निधी दिला असल्यामुळे नगण्य आहे. कंत्राटदारांचे प्रलंबित देयके त्वरित देण्यात यावे, याकरिता मंगळवार 18 फेब्रुवारी रोजी अधीक्षक अभियंता कार्यालयात धरणे आंदोलन करण्यात आले. यापुढील पाऊल म्हणजे मुख्य अभियंता यांच्या कार्यालयास 21 फेब्रुवारीला घेराव करू, असा इशारा निवेदनात देण्यात आला आहे. निवेदन देतेवेळी मंगेश कडू, गजानन लकडे, विनोद चांडक, नितीन डहाके, रवींद्र गुल्हाने, गोपाळ राठी, प्रवीण सोलकर, सुनिल खांडे, प्रवीण बाजड, अविनाश गुल्हाने, प्रशांत बाजड, अनुराग लड्ढा, वैभव गावंडे, प्रदीप चड्डा, अभिषेक गावंडे, प्रमोद पिंपळे, अतुल टिंगणे, वशिम खान, अनिस अहमद, राजेन्द्र अंबुलकर, राजेश त्रिपाठी, राजेश भट्टड, नितीन खेरडे आदी उपस्थित होते.

# दोन कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा

**अमरावती** – महानगरपालिकेत मालमत्ता कर वसुली मोहीम राबविली जात आहे. मात्र, काही कर्मचारी कामात हयगय करीत आहेत. गैरहजर राहणाऱ्या दोन कर्मचाऱ्यांना उपायुक्तांच्या स्वाक्षरीने कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. यात झोन क्रमांक 2 मधील दोघांचा समावेश आहे. 15 व 16 फेब्रुवारी रोजी मालमत्ता कर वसुलीचे शिस्तबद्ध नियोजन केले असताना उपायुक्त नरेंद्र वानखडे यांनी झोन क्रमांक 2 येथे आस्कमिक भेट दिली असता, हे दोघेही गैरहजर आढळून आले. त्यामुळे या कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कार्यवाही प्रस्तावित करण्यात आली आहे.

# 'त्या' आंतरराज्यीय सोनेरी टोळीविरूध्द मकोकाप्रमाणे कलमवाढ !

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 19 )** – शहर गुन्हे शाखेच्या युनिट दोनच्या पथकाने भुसावळ येथून अटक केलेल्या इराणी गँगच्या टोळीतील चेनस्नॅचर्सविरूध्द आता मकोकाप्रमाणे भारतीय न्याय संहितेच्या (बीएनएस)कलम 112 नुसार गुन्हा दाखल करण्यात येणार आहे. तुर्तास एका स्थानिकासह दोन्ही आरोपींना गाडगेनगर पोलिस ठाण्यात नोंद गुन्ह्यात अटक करण्यात आली असून, त्यांच्याकडून 100 ग्रॅम सोन्याची लगड जप्त करण्यात आली आहे. पोलिस जेव्हा या आरोपींना अन्य गुन्हयात अटक करतिल, त्या गुन्हयात ती कलमवाढ करण्यात येईल. बीएनएसचे कलम 112 हे किरकोळ संघटित गुन्हे किंवा सर्वसाधारणपणे संघटित गुन्हयांसंदर्भातील कलम आहे.

चार दिवसांपूर्वी शहर पोलिसांच्या गुन्हे शाखा युनिट दोनचे पोलिस निरिक्षक बाबाराव अवचार यांच्या नेतृत्वातील पथकाने जळगाव जिल्ह्यातील भुसावळ येथून एका अट्टल मंगळसूत्र चोरट्याला अटक केली. त्याने मंगळसूत्र चोरीचे तब्बल 21 गुन्हे केल्याची कबुली दिली. त्यातील 13 गुन्हे हे शहर पोलिस आयुक्तालय हद्दीतील आहेत. तसेच पोलिसांनी त्याच्याकडून 100 ग्रॅम सोने जप्त केले आहे. आणखी रिकव्हरीसाठी पोलिस प्रयत्नशील आहेत. हसन अली उर्फ आशु नियाज अली (21, रा. पापानगर, भुसावळ) असे अटक केलेल्या अट्टल मंगळसूत्र चोरट्याचे नाव आहे.

# चिखलऱ्याच्या निलंबित पोलीस कर्मचाऱ्याचा अपघातात मृत्यू




**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.19 )** – चिखलदरा पोलिस ठाण्यात कार्यरत असलेले निलंबित हेड कॉन्स्टेबल दीपक सोनाळेकर (वय 47) यांच्या कारला 18 फेब्रुवारीच्या रात्री चिखलदरा मार्गावर अपघात झाला.या अपघातात त्यांचा दुर्देवी मृत्यू झाला आहे.

सोनाळेकर हे आपल्या कार क्रमांक एमएच 40 ई 0111 या होंडा सिटी ने चिखलदरा पोलिस ठाण्यात प्रलंबित डायऱ्या व इतर कामकाजासाठी आले होते. रात्री 10 वाजताच्या सुमारास ते परत जात असताना त्यांचे कारवरील नियंत्रण सुटले आणि कार रस्त्याच्या कडेला असलेल्या दगडावर आदळली. अपघाताच्या वेळी त्यांच्या छातीवर जबरदस्त धक्का बसल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला असावा, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. हा अपघात झाल्यानंतर सोनाळेकर जवळपास एक ते दीड तास कारमध्ये अडकले होते. त्या वेळी या मार्गावरून फारशी वर्दळ नसल्यामुळे त्यांना तातडीने मदत मिळू शकली नाही. अखेर पोलिसांना अपघाताची माहिती मिळाल्यानंतर ते घटनास्थळी दाखल झाले. मात्र, तोपर्यंत सोनाळेकर यांचा मृत्यू झाला होता. सोनाळेकर हे चिखलदरा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील बोराट्याखेडा प्रकरणात निलंबित होते. त्यांच्या अचानक झालेल्या निधनामुळे पोलिस दलात तसेच त्यांच्या कुटुंबीय आणि सहकाऱ्यांमध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे.

# सावधान : फळे ,भाज्यातून विषारी रसायने

## विषारी रसायनामुळे गंभीर आजार होण्याची भीती ● मर्यादेपेक्षा जास्त प्रमाणात कीटकनाशकांचा वापर





**महासागर प्रतिनिधी**

**पथ्रोट,( दि.19 )** – लहान मुलांना भाज्या व फळे खाणे आरोग्यासाठी फायदेशीर आहेत, याविषयी डॉक्टर नेहमीच सांगतात. मात्र, बाजारात उपलब्ध असणाऱ्या भाज्या, फळांमध्ये व त्यांच्या घटकामध्ये पोषण मूल्य किती हा प्रश्न आता उदभवत आहे. भाज्या विविध चवदार रसाळफळे आपल्या दैनंदिन आहारात सकस मानली जातात. परंतु, या फळासोबत दररोज घातक रसायने पोटात जात असल्याने नागरिकांना गंभीर आजार होण्याची शक्यता अधिक आहे.

बाजारात विकण्यासाठी फळे ही बागेतून, शेतातून शहरात आणावी लागतात. तसेच मार्केटमध्ये साठवून ठेवावी लागतात. या काळात फळे ताजेतवानी राहावी व टिकावी, त्याचे आयुष्य वाढावे, ती फळे खराब होवू नयेत, यासाठी डीडीटी इथरेल आणि जिन्नालिकचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. घातक रसायनांचा वारेमाप वापर करून ती कृत्रिमरित्या पिकविल्या जातात. त्यानंतर मगच विकली जात असतात. तसेच फळे टिकविणे आणि पिकविण्यासाठी वापरलेल्या घातक रसायनामुळे त्वचेचे विकार उदभवतात. डायबेटीस, पिसीओडी विकार होण्याचा



धोका वाढतो. सध्या बाजारात अनेक फळांचा सिझन नाही, तरीही ती फळे बाजारपेठेत उपलब्ध आहेत.

कारण अनेक महिने ठेवलेली फळे आता विक्रीसाठी बाहेर काढण्यात आली आहे. अर्थातच अधिक काळ टिकावी, यासाठी फळांचे लसीकरण होते. द्राक्षावर

डायक्लोवास-26 हे रसायने वापरतात तसेच ती टिकून राहावी, यासाठी डीडीटीचा सर्रासपणे बेमालूमपणे वापर केला जातो.

उन्हाळ्यात टरबुज पुरवठा अधिक होतो, त्यामुळे त्याचे भाव वाढतात. लालभडक दिसणाऱ्या टरबुजमध्ये सोडियम सॅक्रिन आणि सिंथेटिक रंगाचा वापर केला जातो. अशा फळांमुळे आरोग्यास धोका निर्माण होऊ शकतो, त्यामुळे टरबुज खरेदी करताना काळजी घ्यावी.टरबुज पिकवण्यासाठी ऑक्सिटोसिन इंजेक्शनचा वापर केला जातो. या इंजेक्शनवर सरकारने बंदी घातली आहे. अशा फळांमुळे आरोग्यावर घातक परिणाम होतो. भेसळ आढळल्यास अन्न व औषध प्रशासन विभागाकडून कारवाई करण्यात यावी.

### अधिक कीटकनाशकांचा वापर

30 टक्क्यांपेक्षा अधिक किटकनाशके बाजारात विकल्या जाणाऱ्या फळामध्ये अधिक प्रमाणात किटकनाशके मारले जातात. एका विशिष्ट मर्यादेपेक्षा जादा प्रमाणात कीटकनाशकांचा वापर करणे म्हणजे मोठ्या आजारांना निमंत्रण देणारे ठरणार आहेत. त्यामुळे रासायनिक भाज्या व फळे यांच्या पेक्षा जैविक, सेंद्रिय, फळे, भाज्या खाणे केव्हाही चांगले आहेत, असे आरोग्य तज्ञ सांगतात.

### घातक रसायनांची मात्रा

रासायनिक फळे व भाज्या सेवन केल्याने लहान वयातच मुलांना डोळ्यांना चष्मा लागतो. दैनंदिन जीवनात एकाग्रहता कमी होवून, सातत्य नसल्याने सतत तणाव जाणवणे, त्याचबरोबर भूक न लागणे, अस्थमा, कॅन्सर व त्वचेचे विविध रोग होण्याची भिती असते. आंबा, सफरचंद, द्राक्षे, गाजर, केळी या फळामध्ये घातक रसायनांची मात्रा असते.

# जिल्ह्यात 20 केंद्रावर तूर खरेदीला मुहूर्त

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.19 )** – नाफेडद्वारा तुरीच्या ऑनलाईन नोंदणीची प्रक्रिया 24 जानेवारीपासून जिल्ह्यातील 20 केंद्रांवर सुरू झाली होती. याच केंद्रांवर 13 फेब्रुवारीपासून तुरीची खरेदी करण्याचे आदेश सहकार विभागाने दिले होते. त्याप्रमाणे तूर खरेदीला सुरूवात करण्यात आली आहे. जिल्ह्यात तुरीची हेक्टरी उत्पादकता 1360 किलो ठरविण्यात आली. त्यानुसार1,58,616 टन उत्पादन होईल, त्याचे 25 टक्के म्हणजेच 93,694 टन खरेदी %नाफेड% मार्फत होणार आहे.

खुल्या बाजारात यावर्षी तुरीला हमीभावापेक्षा कमी दर खरेदीसाठी ऑनलाईन नोंदणी सुरू करण्याचे आदेश यंत्रणांना दिले आहेत. नोंदणीला 22



फेब्रुवारीपर्यंत मुदत देण्यात आलेली आहे. त्यामुळे सोयाबीनची खरेदी झालेल्या केंद्रांवरच तुरीसाठी नोंदणी करण्यात येत आहे. जिल्ह्यातील अचलपूर, जयसिंग पथ्रोट, चांदूर रेल्वे, दर्यापूर, धारणी, खल्लार, नेरपिंगळाई, नांदगाव खंडेश्वर, तिवसा, धामणगाव, मोर्शी, वरूड, अमरावती, चांदूर बाजार, अंजनगाव सुर्जी, येवदा, कापूसतळणी, भातकुली, गणेशपूर, शिंगणापूर या केंद्रांवर नोंदणी करता येणार आहे.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# अति संवेदनशील अचलपूरात सीसीटीव्ही कॅमेरांची उणीव

## प्रशासन किती दिवस करणार दुर्लक्ष ?

**महासागर प्रतिनिधी**

*अचलपूर,( दि.19 )- अचलपूर शहर अति संवेदनशील मानले जाते, मात्र येथे सुरक्षेसाठी आवश्यक असलेल्या सीसीटीव्ही कॅमेराची कमतरता आहे. अचलपूर-परतवाडा हे व्यापारी दृष्टिकोनातून महत्त्वाचे शहर असूनही, अनेक प्रमुख चौकांवर सीसीटीव्ही कॅमेरे कार्यरत नसल्याने सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.*



पूर्वी शहरातील विविध भागांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याची घोषणा करण्यात आली होती. पोलिस प्रशासनाने सुरुवातीला काही ठिकाणी कॅमेरे बसवले, मात्र वेळोवेळी देखभाल न केल्यामुळे अनेक कॅमेरे बंद पडले आहे. परिणामी, गुन्ह्यांच्या तपासात पोलिसांना समस्येचा सामना करावा लागत आहे.

अचलपूर आणि परतवाड्याच्या महत्त्वाच्या ठिकाणी ङ्क चावल मंडी, हीरापुरा गेट, मोठी संगत, जुनं बस स्टँड, अकबरी चौक, टक्कर चौक, बीलनपुरा चौक आणि दुल्हा गेट येथे सीसीटीव्ही कॅमेरे नसल्याने सुरक्षेबाबत गंभीर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. एकीकडे प्रशासन अचलपूरला अति संवेदनशील क्षेत्र घोषित करण्यात आले आहे. प्रशासन दुसरीकडे गुन्हेगारी रोखण्यासाठी आवश्यक उपाययोजना

करण्यात अपयशी ठरत आहे. पोलिस प्रशासन गुन्हेगारी नियंत्रणासाठी प्रयत्नशील आहे, मात्र सर्व संवेदनशील ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवले गेले नाहीत, तर सुरक्षा यंत्रणा सक्षम होणार नाही.

### सर्व ठिकाणी सीसीटीव्ही बसवावेत!

स्थानिक नागरिकांच्या मते, डीपीसीच्या माध्यमातून शहरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याचा प्रस्ताव होता. मात्र तो अद्याप ही प्रत्यक्षात आणला गेला नाही. नागरिकांनी खासदार बळवंत वानखडे, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे व अचलपूरचे आमदार प्रविण तायडे आणि यांच्याकडे मागणी केली आहे की, त्यांनी याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे आणि अचलपूरच्या सर्व महत्त्वाच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत. यामुळे शहरातील सुरक्षाव्यवस्था बळकट होईल आणि गुन्हेगारीला आळा बसेल.

# नेरपिंगळाई येथे भाजपच्या नवनिर्वाचित आमदारांचा नागरी सत्कार

## आ. राजेश वानखडे यांची लाडूतुला



**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी,( दि.19 )-** भारतीय जनता पार्टीच्या नेरपिंगळाई शाखेच्या वतीने जिल्ह्यातील नवनिर्वाचित भाजप आमदारांचा नागरी सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत विजयी पाचही भाजप आमदारांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार साहेबराव तट्टे हे होते. यावेळी राज्यसभा सदस्य डॉ. अनिल बोंडे आणि महाराष्ट्र बियाणे महामंडळाचे अध्यक्ष प्रमोद कोरडे प्रमुख अतिथी म्हणून मंचावर उपस्थित होते. तिवसाचे आमदार राजेश वानखडे, धामणगावचे आमदार प्रताप अडसड, मोर्शीचे आमदार उमेश यावलकर, अचलपूरचे आमदार प्रवीण तायडे आणि मेळघाटचे आमदार केवलराम काळे यांचा शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तिवसाचे आमदार राजेश वानखडे यांची यावेळी लाडूतुला करण्यात आली. राजेश वानखडे यांनी आपल्या भाषणातून नेरपिंगळाई गावाच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले. पिंगळाई गड रस्त्याचे काम तात्काळ सुरू करण्यात येईल व नेरपिंगळाई येथे तहसील कार्यालयाकरिता पाठपुरावा करणार असल्याचे राजेश वानखडे यांनी सांगितले. यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य शरद मोहोड, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष प्रवीण राऊत यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रकाश कनेर यांनी तर संचालन ज्ञानेश्वर टिंगणे यांनी केले. अनिल फंदे यांनी उपस्थितांचे आभार मानलेत. कार्यक्रमाला भाजपचे शाखाध्यक्ष नारायण तव्वर, पद्माकर पाखोडे, प्रदीप गौरखेडे, छाया दंडाळे, मंगेश बोंडे, दत्ता गेडाम, निलेश शिरभाते, निलेश श्रीखंडे, देवकुमार बुरंगे, प्रशांत सरदार आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

# आज कळमगाव येथे प्रथमेश इंदुरकर यांचे व्याख्यान

## शिवजयंतीनिमित्य श्रीकृपा सामाजिक प्रतिष्ठानचे आयोजन



**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे, ( दि. 19 ) -** चांदूर रेल्वे तालुक्यातील कळमगाव येथे श्री कृपा सामाजिक प्रतिष्ठान तर्फे दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुध्दा शिवजयंती महोत्सव आयोजित केला असुन यात आज 20 फेब्रुवारीला सायंकाळी 6 वाजता महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध व्याख्याते प्रथमेश इंदुरकर (कोल्हापुर, इचलकरंजी) यांचा व्याख्यानाचा कार्यक्रम आयोजित केला आहे. श्री संत भाऊजी महाराज चौक, कळमगांव येथे आयोजित सदर व्याख्यानाला जास्तीत जास्त नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन आयोजक श्रीकृपा सामाजिक प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. सागर राजेंद्र वाघ, उपाध्यक्ष तथा कळमगावचे सरपंच ॲड. शिवाजी नरेंद्र वाघ, सचिव डॉ. सौरभ गावंडे, सहसचिव पवन वाघ, गौरव वाघ, सदस्यगण अजिंक्य वाघ, निकेश वाघ, अमर वाघ, वैभव वाघ, आयुष वाघ, साहिल वाघ, श्रेयश वाघ, सौरश वाघ, तेजस वाघ, आकाश वाघ, अनुज वाघ, सार्थक वाघ, नयन गुडधे, ओम वाघ व समस्त गावकरी मंडळी, कळमगांव यांनी केले आहे.

# मनपात संत सेवालाल महाराज जयंती साजरी



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 19 ) -** संत सेवालाल महाराज जयंती कार्यक्रम शनिवारी (दि.15) अमरावती महानगरपालिकेत संपन्न झाला. मनपा अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख यांच्या हस्ते संत सेवालाल महाराज यांचे प्रतिमेस हारार्पण करुन अभिवादन महानगरपालिका कॉन्फरन्स हॉल येथे करण्यात आले. यावेळी वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ.अजय जाधव, कार्यालय अधिक्षक नंदकिशोर पवार, जेष्ठ स्वास्थ निरीक्षक राजेश राठोड, प्रल्हाद चव्हाण, सतिश पवार, प्रमोद मोहोड, भुषण खडेकार, शिवा फुटाणे, राकेश पाटील, सुर्या तिवारी, जिवन राठोड, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# लाहोटी महाविद्यालयात विशेष श्रमसंस्कार शिबिर

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी ( दि. 19 ) -** श्री आर आर लाहोटी विज्ञान महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रम संस्कार शिबिराचा उद्घाटन सोहळा दत्तक ग्राम पारडी येथे (दि.14) संपन्न झाला. उद्घाटक म्हणून पारडी येथील सरपंच वर्षा वानखडे, अध्यक्ष म्हणून प्रा डॉ.आतिष कोहळे तर प्रमुख अतिथी म्हणून नंदकिशोर धावडे, पोलीस पाटील संजीवनी राऊत,प्रा.विलास अंबाडकर, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. अविनाश उल्हे, सहकार्यक्रम अधिकारी डॉ. शशिकांत इखे, रासेयो महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. विजया चव्हाण हे मंचावर उपस्थित होते.



कार्यक्रमाची सुरुवात विद्यापीठ व एनएसएस गीताने करण्यात आली.याप्रसंगी राष्ट्रीय विशेष श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन वृक्षारोपण करून करण्यात आले. भाषणातून आशा वानखडे यांनी शिबिरार्थ्यांना देशसेवेसाठी त्यांच्या योगदानाचे महत्त्व विशद केले.

डॉ.आतिष कोहळे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून विशेष श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यामागचा हेतू विद्यार्थ्यांना समजावून सांगितला व त्यांचे समाजाप्रती असणारे कर्तव्याची जाण करून दिली.

प्रास्ताविक रासेयो अधिकारी डॉ. अविनाश उल्हे यांनी तर संचालन आकांक्षा गायकवाड व आभार शामल इंगोले यांनी मानले. कार्यक्रमाला डॉ. सोनल बाकडे, प्रा. नितीन कोळेकर, अंकित औतकर, रवी महाजन, श्रेयस राऊत, ग्रामपंचायत सदस्य व गावकरी मंडळी उपस्थित होते.

# निधी देवरेचा तक्षशिला महाविद्यालयात सत्कार

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 19 ) -** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या वुमेन्स स्टडीज सेंटर तर्फे आयोजित परिसंवाद सादरीकरण स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविण्यार्या निधी देवरेचा तक्षशिला महाविद्यालयात सत्कार (दि.14) करण्यात आला. निधी तक्षशिला महाविद्यालयात बी.ए. भाग 3 मध्ये शिकत असून स्पर्धेच्या संदर्भात तिला मार्गदर्शक म्हणून मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. पंडित राठोड व प्रा. बबन इंगोले होते. स्पर्धेसाठी तिची पूर्णपणे तयारी करून घेतली. स्पर्धेत प्रथम क्रमांक आल्यावर तिला विद्यापीठाकडून प्रमाणपत्र आणि सन्मान चिन्ह



देण्यात आले. प्राचार्य डॉ.माधुरी फुले व इतर प्राध्यापकांनी निधीचा सत्कार करून तिचे कौतुक केले आहे. तसेच निधीच्या या यशस्वी कामगीरीमुळे इतर विद्यार्थ्यांना नक्कीच प्रेरणा मिळेल,असे मतही प्राचार्या यांनी व्यक्त केलेले आहे.

# गृहिणींमधील सुप्तकलांना वाव देणारे वयवट

## आला आला उन्हाळा, सांडगे-पापड घाला | वर्षभराची बेगमी वाळवण आठवणीतच







**नितीन दुर्बुडे**

**पथ्रोट, ( दि.19 ) -** उन्हाळा हा ऋतू जरा त्रासदायक वाटला, तरी भारतीय खाद्यसंस्कृतीत त्याचा मोलाचा वाटा आहे. वाळवणाचे पदार्थ बनवून त्याची बेगमी करणाऱ्या महिलांची लगबग हे उन्हाळ्याचे वैशिष्ट्य. वाळवणास वऱ्हाडात वयवट असे म्हटल्या जाते. कुरकुरीत कुरडया, सांडगे, पापड-पापड्या, लज्जतदार मसाले, लोणची, मुरांबे हे सर्व पदार्थ त्या काळात डबाबंद वा बरणीबंद होत असतात. वाळवण संस्कृतीत वैविध्य आहे; प्रांताप्रांतानुसार ते पदार्थ बदलतात.

पावसाळ्यात भाज्या तुरळक असण्याच्या काळात कामाला येते ते वाळवण. आज वाळवणांचा पूर्वीचा रुबाब क्वचितच दिसत असला तरीही वाळवण म्हणजे अवघी आनंदाची साठवणच असते. चारचौघींनी चक्क पोरांना सोबतीला घेऊन तापल्या दिवसांत केलेले पदार्थ म्हणजे वाळवणं. चारचौघींनी एकत्र येऊन केल्या जाणार्या या वाळवणांच्या दिवसांनी चवीच्या रंगढंगानुसार गृहिणींची सुखदु:ख वाटून घेतली जातात. आजही कित्येकांच्या घरी उन्हाळ्यात वाळवणाचा कार्यक्रमाचा बेत आखला जातो. उन्हाचे चटके बसू नयेत किंवा वाळवणाला चांगले ऊन मिळावे म्हणून हे सगळे पदार्थ सकाळी लवकर उठून केले जातात. कारण ऊन वाढले की पायाला चटके बसतात. मग ते वाळवणं घालायला त्रास होतो. शिवाय उशिरा वाळवण घातले की मग त्यांना ऊनही कमी लागते. मग अंगण, गच्ची आदी कुठेही जिथे वाळवणं घालायची तिथली जागा स्वच्छ केली जाते. एखादे प्लास्टिकचे भले मोठे कापड टाकले जाते आणि ते उडू नये म्हणून त्याच्या कोपर्यावर विटा किंवा दगड ठेवले जातात आणि मग नाचणीचे, नंतर उडदाचे पापड, मग साबुदाण्याच्या पापड्या आणि चकल्या, नंतर मिश्र डाळींचे वडे किंवा सांडगे, मुंगवड्या, शेवया, सरगुंडे, आलु चिप्स मग सगळ्यात शेवटी गव्हाच्या कुरडया. कारण गव्हाच्या चिकाच्या कुरडया करायच्या म्हणजे मोठाच घाट घालवा लागतो. ते गहू भिजत घालून आंबवणं वगैरे. अशी ही घरोघरी दिसणारी वाळवणं महिलेच्या किंवा मुलांच्या कौतुकाचा, आनंदाचा आणि औत्सुक्याचा विषय असायचा. मात्र आता ती मोठी अंगणं नाहीत किंवा गच्च्या नाहीत. त्यामुळे वर्षभराची ही बेगमी आता कित्येकांच्या आठवणीतच राहिलेली दिसून येत आहे. चारचौघींनी एकत्र येऊन केल्या जाणार्या या वाळवणांच्या दिवसांनी चवीच्या रंगढंगानुसार गृहिणींची सुखदु:ख वाटून घेतली आहेत. लग्नातल्या रुखवतामध्ये रंग भरलेले वाळवणं विकत मिळतील पण त्यातल्या या गोडधोड आठवणींचं काय ?

### पापडाचा उल्लेख बौध्द कालखंडापासून

पापडांचा उल्लेख थेट बौद्ध काळापासून आढळतो. सांडगे व पापडाची वर्णने तेराव्या शतकातील कानडी व मराठी साहित्यात ठायी ठायी आहेत. चितोडच्या सम्राटाने अल्लाउद्दीन खिलजीला दिलेल्या मेजवानीत मेंथौरी किंवा कुम्हरौरी म्हणजे कोहळ्याचे सांडगे होते असे वर्णन चौदाव्या शतकातील मुहोम्मद जायसीने लिहिलेल्या 'पद्मावत' या काव्यात आहे.

### आदिमानवापासून पदार्थ संरक्षित

आदिमानव तो शिकार करून आणलेल्या प्राण्यांचे मांस उरले, की ते वाळवून पुढे, गरजेच्या वेळी खाता येते हे अनुभवाने शिकला असेल. पुढे, तो त्याच्या लक्षात मिठाचे गुणधर्म आल्यावर पदार्थ खारवू लागला. तो तेल, साखर, मीठ, लवंग, मोहरी, काळे मिरे या सर्वाचा वापर पदार्थ संरक्षित ठेवण्यासाठी; त्याचबरोबर, त्याची चव वाढवण्यासाठीही करू लागला. तेव्हापासून ते आजतागायत वाळवण्याच्या प्रथेचे पालन होत आहे.

# तापडिया सिटी सेंटर मॉलमध्ये भव्य 'वीर गाथा' समारंभ

## छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शौर्य आणि वारशाचा उत्सव

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 19 ) -** तापडिया सिटी सेंटर मॉलमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त वीर गाथा भव्य समारंभ आयोजित केला जात आहे. चार दिवसीय कार्यक्रमाचा उद्देश छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शौर्य, नेतृत्व आणि सांस्कृतिक वारशाला लोकांपर्यंत पोहोचविणे हा आहे. हा समारंभ 15 ते 19 फेब्रुवारी दरम्यान आयोजित करण्यात आला असून ज्यामध्ये ऐतिहासिक सादरीकरणे, पारंपरिक प्रदर्शने आणि सांस्कृतिक कार्यक्रमांची एक विशेष शृंखला समाविष्ट असेल.

या प्रदर्शनीमध्ये विजया कॉन्व्हेंट, मोहनलाल सामरा, डीपीएस, एसओएस, टोमोए, हरिकृष्ण मालू, गोल्डन किड्स हायस्कूल, नारायणा, सेंट फ्रान्सिस हायस्कूल, पोदार इंटरनॅशनल काठोरा, नीवम कॉन्सेप्ट स्कूल, पोदार इंटरनॅशनल बडनेरा, एडीफाय, टायटन, शाश्वत स्कूल, तखतमल इंग्लिश हायस्कूल, मणिबाई गुजराती हायस्कूल आणि इंडो पब्लिक स्कूल, ऋङ्कद्रङ्कह्यद्धह्लद्द ह्यष्द्धश्शद्य या 19 शाळांचे विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत.

**कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण:**

15 फेब्रुवारीला भव्य



शिवाजी महाराज जयंती परेड सकाळी 10 वाजता, पारंपरिक मराठा योद्ध्यांच्या पोशाखात कलाकार, ढोल-ताशा पथक आणि भगवा ध्वजांसोबत एक अद्वितीय देखावा सादर केला जाईल. 16 फेब्रुवारीला सायं. 6-30 वाजता मर्दानी खेळांचे आयोजन करण्यात आले आहे, ज्यामध्ये पारंपरिक युद्धकला सादर केली जाईल. सव्यसाची गुरुकुलम्, कोल्हापूरचे 12 कलाकार (6 पुरुष व 6 महिला) तलवारबाजी, लाठी युद्ध आणि इतर ऐतिहासिक शस्त्रकला प्रदर्शित करतील. वीर गाथा शृंखलेअंतर्गत छत्रपती शिवाजी महाराज यांचे बालपण, त्यांचा आदर्श आणि माता जीजाबाईंच्या संस्कारांवर विशेष व्याख्यान, तसेच संध्याकाळी आरतीचे आयोजन करण्यात आले आहे. 16 ते 19 फेब्रुवारी दरम्यान सायं. 6 वाजता छत्रपती शिवाजी महाराज यांचे प्रशासकीय धोरण आणि जलसेना रणनीतींवर आधारित व्याख्याने होणार आहेत. 19 फेब्रुवारीला सकाळी मुख्य कार्यक्रमामध्ये पारंपरिक पूजन आणि दिप प्रज्वलन,सायं. 6 वाजता भव्य छत्रपती शिवाजी महाराज जयंती समारंभ तुतारीच्या गजरात आणि ढोल-ताशाच्या निनादात साजरा होणार आहे. बेस्ट वॉरियर स्पर्धा 19 फेब्रुवारी रोजी होणार असून नोंदणीसाठी मो.क्र. 9422655830 संपर्क साधावा, तसेच नागरिकांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा,असे आवाहन करण्यात आले.

# छत्रपती शिवाजी महाराजांचा दैदीप्यमान इतिहास पुढे आला पाहिजे!

## शिवश्री सुधीर थोरात यांचे प्रतिपादन | शिवजयंती निमित्त विद्यापाठात राज्यस्तरीय कार्यशाळा

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.19 )-** छत्रपती शिवाजी महाराजांचा दैदीप्यमान इतिहास पुढे आला पाहिजे, त्यासाठी अभ्यास समित्या, प्राध्यापकवर्गांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन पुणे येथील प्रसिध्द शिवव्याख्याते शिवश्री सुधीर थोरात यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागांतर्गत येणार्या एम.ए.छत्रपती शिवाजी महाराज विचारधारा व व्यवस्थापन अभ्यासक्रमाच्यावतीने बुधवारी (ता.19) आयोजित राज्यस्तरीय कार्यशाळेत बीजभाषण करतांना ते बोलत होते.



यावेळी विचारपीठावर अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्रमुख अतिथी तथा उद्घाटक म्हणून व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. प्रवीण रघुवंशी, व्य.प. सदस्य डॉ. नितीन चांगोले, अधिसभा सदस्य प्रा.श्रीकांत काळीकर, आजीवन व अध्ययन विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील उपस्थित होते. सुधीर थोरात यावेळी पुढे म्हणाले, शिवपूर्व काळात अनेक आक्रमणे झालीत. अन्याय, अत्याचार, लुटमार, बंदी बनविणे, महिलांची परदेशात विक्री, आपल्याच देशात राहून जिजीया कर भरावा लागणे, एवढेच नव्हे, तर मृतदेहांचीही विटंबना केली जात होती. अशा परिस्थितीत छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म झाला आणि छत्रपती शहाजी राजे आणि राजमाता जिजाऊ यांनी महाराजांना बालपणापासूनच सर्वप्रकारचे धडे दिले. बालपणी मिळालेल्या शिक्षणातून छत्रपती शिवाजी महाराज तरबेज झालेत आणि पुढे त्यांनी स्वतऱ्चे आरमार, पायदळ, घौडदळ, गुप्तचर विभाग, संरक्षण विभाग, प्रधान अष्टमंडळ असे तयार करुन स्वराज्याची निर्मिती केली. लोककल्याणासाठी राज्यकारभार करावयाचा असा छत्रपती शिवाजी महाराजांचा एकमेव मानस होता व तो त्यांनी करुन दाखविला. महाराजांचे व्यवस्थापन अतुलनीय होते. तसेच त्यांचे उत्तम प्रशासन होते. मात्र महाराजांचा इतिहास इंग्रज काळात पुढे येऊ दिल्या गेला नाही. त्यामुळे महाराजांचा दैदीप्यमान इतिहास पुढे आला पाहिजे आणि त्यासाठी अभ्यास समित्या, प्राध्यापकवर्गांनी पुढाकार घेऊन विद्यार्थ्यांनीही महाराजांच्या विचाराची प्रेरणा घेऊन तो अंगिकारावा, असे आवाहन देखील शिवश्री सुधीर थोरात यांनी याप्रसंगी केले. उद्घाटन



झाल्याची घोषणा करुन डॉ. प्रवीण रघुवंशी म्हणाले, व्याख्यानमालेच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराजांचे एकंदरीत व्यवस्थापन, त्यांचे कार्य विद्यार्थ्यांना कळेल. छत्रपती शिवाजी महाराजांनी लोकशाही पध्दतीनेच आपल्या राज्याचा कारभार केला. नौदलाची स्थापना करणारे छत्रपती शिवाजी महाराज पहिले राजे होते. ते लोककल्याणकारी राजेच नाही, तर उत्कृष्ट प्रशासकही होते. प्रा. श्रीकांत काळीकर म्हणाले, विद्यापीठ हे संस्कारपीठ आहे आणि दीपस्तंभाप्रमाणे विद्यार्थ्यांसाठी विचार प्रवाहीत होतात. व्याख्यानमालेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेली परीक्षेची संकल्पना देखील उत्कृष्ट असल्याचे सांगितले.

### महाराजांचे विचार विद्यार्थ्यांनी अंगिकृत करावे - कुलगुरू डॉ. बारहाते

राजेमहाराजांमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. त्यांच्या कारभाराचे सूक्ष्म नियोजन, दूरदृष्टी याची विद्यार्थ्यांनी प्रेरणा घ्यावी. सूरत लुटल्यानंतर महाराजांनी त्यांच्या गनिमी काव्याने मोघलांना कसे पराभूत केले. रायगडावरील हत्तींबाबत महाराजांची दूरदृष्टी कशी होती आणि यातून महाराजांचे सूक्ष्म नियोजन कसे होते, हे दिसून येते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार अंगिकृत करावे आणि तीच खरी त्यांना आदरांजली ठरेल असे सांगून कार्यशाळेच्या माध्यमातून जी वातावरण निर्मिती झाली आणि विद्यार्थ्यांसाठी प्रश्नमंजुषेची मांडलेली संकल्पना याबद्दल कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी आजीवन अध्ययन विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील यांची अभिनंदन केले.

# हिवरखेडच्या दिव्यांग विद्यार्थ्यांला महाविद्यालयात प्रवेश नाकारला?

**महासागर प्रतिनिधी**
**हिवरखेड, ( दि.19 )-** मोर्शी तालुक्यातील हिवरखेड येथील एका दिव्यांग तरुणाला गुणवत्ता यादीत गुण मिळूनही महाविद्यालयात प्रवेश देण्यात आला नाही. परिणामी, त्याला शिक्षणापासून वंचित ठेवले जात असल्याचे समोर आले आहे. दिव्यांग विद्यार्थ्याने आरोप केला आहे की, जेव्हा तो प्रवेशासाठी महाविद्यालयात गेला तेव्हा त्याला अपमानित करण्यात आले आणि रॅगिंग करण्यात आले आणि तेथून हाकलून देण्यात आले. या प्रकरणी विद्यार्थ्याने पोलिसांकडे तक्रारही दाखल केली आहे.

हिवरखेड येथील रहिवासी अनूप अशोकराव गुलकरी यांना न्यूरोलॉजिकल अपंगत्व आहे आणि त्यांनी वाशिममधील रामराव सरनाईक महाविद्यालयात सामाजिक कार्याच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेण्यासाठी अर्ज सादर केला आहे. अनुप गुलकरी यांना रामराव सरनाईक महाविद्यालयातून अपमानास्पद वागणूक देवून परत पाठवण्यात आले. महाविद्यालयात अपंग कोट्यातून प्रवेश घेण्यासाठी गुणवत्ता यादीत एक क्रमांक देण्यात आला होता. त्यानुसार,



जेव्हा तो प्रवेशासाठी महाविद्यालयात गेला तेव्हा त्याला प्रवेश देण्यात आला नाही आणि गुलकरी यांनी शिक्षकांकडून मानसिक छळ आणि रॅगिंग झाली असल्याचा आरोप केला. या विद्यार्थ्याने आपल्यावर झालेल्या अन्यायाविरुद्ध वाशिम येथील समाज कल्याण विभागाच्या सहाय्यक आयुक्तांकडे तक्रार दाखल केली आहे. त्यात म्हटले आहे की, रामराव सरनाईक महाविद्यालयात ऑगस्टमध्ये प्रवेश परीक्षा घेण्यात आली होती आणि गुणवत्ता यादीनुसार 2024-25 या वर्षासाठी दिव्यांग कोट्यातून किती उमेदवारांना प्रवेश देण्यात आला याची माहितीही मागितली आहे. सरनाईक कॉलेजच्या प्राचार्यांकडून अनूप गुलकरी यांना शिक्षणाचा अधिकार आणि भविष्यातील रोजगाराच्या संधी हिरावण्यात आल्या असल्याचे दिसत आहे.

# नाग मंदिर संस्थानमध्ये श्रीमद् भागवत व हरिकीर्तन सप्ताह

## 1 ते 8 मार्च दरम्यान आयोजन

**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर रेल्वे, ( दि. 19 ) -** दरवर्षी प्रमाणे याही वर्षी तालुक्यातील श्री क्षेत्र नागमंदिर संस्थान, चांदूरवाडी येथे कथा वाचक ह.भ.प. केशव महाराज मोरे (म्हैसपुर) यांच्या सुश्राव्य वाणीतून संगीत भागवताचे आयोजन 1 ते 8 मार्चदरम्यान करण्यात आले आहे. या सप्ताहात दररोज सकाळी काकडा, दुपारी भागवत, सायंकाळी हरीपाठ, रात्री हरिकीर्तन व भव्य विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताह दरम्यान अनेक अन्नदाते अन्नदान करणार आहे. तर 8 मार्च रोजी सकाळी 11 वाजता ह.भ.प. लक्ष्मणदास काळे महाराज (आमला विश्वेश्वर) यांचे काल्याचे किर्तन होणार असून दुपारी 2 वाजता पासून महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. याशिवाय 8 मार्च रोजी सकाळी रक्तदान शिबिर, दंत व नेत्र तपासणी



शिबिर व आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन सुद्धा करण्यात आले. तरी या सर्व कार्यक्रमांचा भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन नागमंदिर संस्थान, चांदूरवाडी तर्फे करण्यात आले आहे. तर सदर 7 दिवस मुक्कामी येणाऱ्या भाविकांनी मौल्यवान दागिणे किंवा किंमती वस्तु सोबत आणु नये, सप्ताहात राहण्याची व फराळ, जेवणाची व्यवस्था केल्या जाईल आणि येतांना आपली चादर किंवा शाल सोबत आणावी असे संस्थानच्या वतीने कळविण्यात आले आहे.

# दुचाकीवरून दारु वाहतुक करतांना एक ताब्यात



**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर रेल्वे ( दि. 19 )-** चांदूर रेल्वे शहरातून दुचाकीवरून दारू वाहतुक करतांना एकाला ताब्यात घेतल्याची कारवाई मंगळवारी (ता. 18) सकाळी 11.30 ते 12 वाजताच्या दरम्यान पीएसआय नंदलाल लिंगोट यांच्या नेतृत्वात चांदूर रेल्वे पोलीसांनी केली. यात 77 हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलीसांना मिळालेल्या गुप्त खबरेवरून शहरातील यादव मंगल कार्यालयाजवळून जाणाऱ्या एका दुचाकीवर दारू ची रेड केली असता आरोपी अक्षय सुरेश तसरे (रा. मिलिंद नगर चांदूर रेल्वे) याचे ताब्यातून दुचाकी क्र. एमएच 27 डीजी 0845 किंमत अंदाजे 70 हजार रूपये व विदेशी दारू 48 नग किंमत अंदाजे 7 हजार 200 रूपये असा एकूण 77 हजार 200 रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला व आरोपीविरूध्द पोलीसांनी कारवाई केली. ही कारवाई ठाणेदार अजय आकरे यांच्या मार्गदर्शनात पीएसआय नंदलाल लिंगोट, ना.पो.कॉं. प्रशांत ढोके, पो.कॉं. रवि भुताडे, सागर पाचपोर यांनी केली.

# जिल्हास्तरीय कृषी प्रदर्शनी कार्यक्रमात प्रगतशील शेतकऱ्याचे मनोगत

**महासागर प्रतिनिधी**
**कुऱ्हा ( दि. 19 ) -** कृषी विभाग आणि कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा यांच्यावतीने आयोजित कृषी विकास परिषद व प्रदर्शनीचे शुक्रवार, 14 फेब्रुवारी रोजी उद्घाटन झाले. ना. कृषिमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांच्याहस्ते या प्रदर्शनीचे उद्घाटन दुपारी 2 वाजता सायंस्कोर मैदान येथे झाले. यावेळी खासदार डॉ. अनिल बोंडे, बळवंत वानखडे, अमर काळे, आमदार किरण सरनाईक, धीरज लिंगाडे, रवी राणा, सुलभा खोडके, प्रताप अडसड, केवलराम काळे, राजेश वानखडे, प्रवीण तायडे, उमेश यावलकर, गजानन लवटे, कृषी आयुक्त सूरज मांढरे, जिल्हाधिकारी सौरभ कटियार, मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता मोहपात्रा, विभागीय कृषी



सहसंचालक प्रमोद लहाळे, जिल्हा शेतकरी सल्लागार समिती अध्यक्ष नरेंद्र शिंगणे आदी उपस्थित होते.

**कृषिविकास परिषद व प्रदर्शनीमध्ये 17 फेब्रुवारी रोजी** सकाळी प्रयोगशील आणि प्रगतशील शेतकरी भानुदास वानरे यांनी गांडुळ खत व्यवस्थापन, गांडुळ खत विक्री व्यवस्थापन, पशुखाद्य म्हणून अझोला उत्पादन आणि विक्री बद्दल शेतकऱ्यांना माहिती दिली. तसेच शेतकऱ्यांना शेती व्यवसाय सोबत नवीन उपक्रम काय काय करता येतील याबद्दल प्रशिक्षण दिलेत. तसेच दुपारी 3.30 वाजता प्रयोगशील आणि प्रगतशील शेतकरी निखिल तेटू यांनी विषमुक्त देशी बियाणे बद्दल शेतकऱ्यांना माहिती दिली. तसेच सेंद्रिय निविष्ठा, जैविक शेती बद्दल प्रशिक्षण दिले. आणि जमिनीतील सेंद्रिय कर्ब, पिकांचे एकात्मिक पद्धतीने कीड व्यवस्थापन याबद्दल माहिती दिली आणि विशेष म्हणजे रानभाजी संवर्धन बद्दल नवीन उपक्रम मांडला गेला.शेवटी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन स्मार्ट प्रकल्पाचे पुरवठा व मुल्य साखळी तज्ञ निलेश राठोड यांनी केले. त्यांनी कृषी विभाग मार्फत शेतकरी उत्पादक कंपनी यांचेसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती दिली. तसेच शेती व्यवसाय सोबत शेतकऱ्यांनी नवनवीन शेतीपूरक उपक्रम राबविले पाहिजे असे आवाहन केले.

# श्री संत मंगेश महाराज प्रगट दिन सोहळा आज

चांदूरवाडी जवळील असलेल्या श्री क्षेत्र नाग मंदीर (गव्हाळा,) येथे श्री संत मंगेश महाराज प्रगट दिन सोहळा आज 19 फेब्रुवारी ला सकाळी 9.30 वाजता मोठ्या थाटात संपन्न होणार आहे. यावेळी भजनाचा कार्यक्रम श्री संत मंगेश महाराज स्वरांजली संच चांदूर रेल्वे यांच्या सुमधुर वाणीतून होणार आहे. त्याचबरोबर महाराजांची तुला व त्यानंतर परमपूज्य बाबाचा आशीर्वादपर शब्द व मार्गदर्शन राहणार आहे. तरी सर्व भाविक भक्तांनी या कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# गो.सी. टोम्पे महाविद्यालयात सुरक्षा जनजागृती व कायदेविषयक कार्यशाळा

**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर बाजार ( दि. 19 ) -** स्थानिक गो.सी टोम्पे महाविद्यालयातील महिला तक्रार निवारण समिती व्दारा प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांसाठी, सुरक्षा जनजागृती व नवीन कायद्याविषयी मार्गदर्शनपर कार्यशाळेचे आयोजन करण्यात (दि.17) आले होते. या कार्यशाळेमध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र रामटेके उपस्थित तर प्रास्ताविक महिला



समितीच्या समन्वयक डॉ. मंजुषा पवार यांनी केले. प्रमुख अतिथी ॲड.हेमंत जनबंधू यांनी नवीन कायदा व कलम याबद्दल सर्व विद्यार्थ्यांना आणि प्राध्यापकांना माहिती दिली. तसेच दुसरे मार्गदर्शक वानखडे यांनी सायबर सुरक्षा जनजागृती बद्दल माहिती दिली. सर्व विद्यार्थ्यांनी, प्राध्यापकांनी कशी सावधगिरी बाळगावी हे आपल्या मार्गदर्शनातून त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे आभार डॉ. पार्वती शिर्के यांनी मानले.

# श्री हव्याप्र मंडळाच्या योग कार्यशाळेत तज्ञांचे मार्गदर्शन

## 749 योगसाधकांचा सहभाग : प्रात्यक्षिकाद्वारे मार्गदर्शन

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 19 ) -** श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन योग विभागातर्फे 44 वी आचार्य त्र्यंबक गुरुजी जोशी स्मृती योग व्याख्यानमाला व 25 वी डॉ. एन. व्ही. करबेलकर स्मृती योग कार्यशाळा (दि.14) संपन्न झाली. या कार्यशाळेत ज्येष्ठ योगतज्ज्ञ डॉ. सूर्यकांत पाटील यांनी प्राणायाम आणि स्वास्थ्य या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. उपस्थित योग साधकांना प्रात्यक्षिकांद्वारे अनुभूती देण्याचा प्रयत्न करण्यात आला. या कार्यक्रमाला 268 महिला व 481 पुरुष, असे एकूण 749 योगसाधकांनी आभासी पद्धतीने, तर 63 साधकांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून व्याख्यानमालेचा लाभ घेतला.

दुपारी 3 वाजता 44 वी आचार्य त्र्यंबक गुरुजी जोशी स्मृती योग व्याख्यानमालेचे उद्घाटन झाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. श्रीनिवास देशपांडे होते, तर उद्घाटक म्हणून ओरिएंटल इन्स्टिट्यूट, एम. एस. युनिव्हर्सिटी, बडोदा चे माजी उपसंचालक डॉ. सिद्धार्थ वाकणकर उपस्थित होते. प्रमुख



अतिथी म्हणून सचिव डॉ. माधुरी चेंडके, विश्वनाथ जोशी तसेच आंतरराष्ट्रीय योगगुरु डॉ. अरुण खोडसकर उपस्थित होते.

प्रस्ताविक डॉ. सुनील लाबडे यांनी केले. या प्रसंगी डॉ.सिद्धार्थ वाकणकर यांनी डॉ. करबेलकर यांची लिखाण संपदा प्रकाशित होणे आवश्यक आहे असे मत व्यक्त केले, तर डॉ. अरुण खोडसकर यांनी आचार्य त्र्यंबक गुरुजी जोशी आणि डॉ. नानासाहेब करबेलकर यांच्या कार्याचा परिचय दिला.

व्याख्यानमालेतील पहिले पुष्प बृहन महाराष्ट्र योग परिषद, कोषाध्यक्ष प्रा. एस. टी. येवतकर यांनी गुंफले. त्यांनी शरीर स्वास्थ्यासाठी षट्कर्म (शुद्धीक्रिया) या विषयावर मार्गदर्शन केले व षट्कर्माचे महत्त्व विषद केले. द्वितीय सत्रात महाराष्ट्र भारतीय योग संस्थान, दिल्ली उप-प्रांतप्रमुख प्रा. डॉ. उत्तम काळवणे यांनी तणावमुक्त जीवनासाठी योग या विषयावर मार्गदर्शन केले. त्यांनी तणाव दूर करून आरोग्यदायी जीवन जगण्याच्या उपाययोजना सांगत काही प्रात्यक्षिकेही करून दाखवली.

कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण योगशास्त्र विभागाच्या अधिकृत यूट्यूब चॅनेल वरून करण्यात आले. संचालन प्रा. संपदा आगरकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. संदीप मांदळे यांनी मानले. यशस्वी आयोजनासाठी पद्मश्री प्रभाकरराव वैद्य यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. सुनील लबडे, प्रा. नितीन काळे, प्रा. प्रवीण अनासाने, प्रा. अर्चना देशपांडे, प्रा. प्रतीक पाथरे, प्रा. संपदा आगरकर, प्रा. सागर हाते, प्रा. सुषमा शिरभाते, प्रा. प्रमोद शिरभाते, प्रा. प्रणय पवार, अमोल ढोले, नरेश बाखल, जोशी, श्वेता काजळकर, मानमोडे व झोंबाडे यांनी अथक परिश्रम घेतले.

# ऐन यात्रेच्या तोंडावर हिवरखेड-सालबर्डी मार्गाची दुर्दशा

**महासागर प्रतिनिधी**
**हिवरखेड,( दि.19 ) -** महाशिवरात्रीनिमीत्त सालबर्डी येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही यात्रा भरणार आहे. मात्र हिवरखेड मार्गाहून सालबर्डीकडे जाणाऱ्या भाविकांना हा प्रवास त्रस्त करुन सोडणारा ठरणारा आहे. कारण या मार्गाची अत्यंत दुर्दशा झाली आहे. या मार्गावरुन वाहनाने जाणे तर कठीणच मात्र पायी चालणेही सर्कसपेक्षा कमी नाही.



महाराष्ट्र आणि मध्यप्रदेशच्या सीमेवर सातपुडा पर्वतरांगेच्या कुशीत %सालबर्डी देवस्थान% वसलेलं आहे. अमरावतीमधील मोर्शी तालुक्यात असलेल्या या देवस्थानी महाशिवरात्रीच्या पर्वावर हजारो भाविकांची गर्दी होत असते. कारण येथे निसर्गरम्य पहाडांच्या कुशीत महादेव वसले आहेत. महादेवाचं दर्शन घेणं भाग्याचं आहे, अशी श्रद्धा अनेक भाविकांची आहे. सालबर्डी येथील सातपुडा पर्वताच्या उंच टोकावर एका गुफेमध्ये प्राचीन असे शिवलिंग आहे. हे शिवलिंग अतिशय पुरातन असल्याचं मानलं जातं. भुयारामध्ये सुमारे 100 फूट आतमध्ये उतरल्यावर महाकाय दगडाच्या आतल्या पोकळीत सपाट असणाऱ्या जागेवर शिवलिंगाचं दर्शन होतं. महाभारत काळात पांडव या भागात वास्तव्याला होते. त्यामुळं या ठिकाणी पांडव कचेरी देखील आहे. भुयारातील शिवलिंगासह या सर्वच ठिकाणांच्या यात्रेत येणारे भाविक दर्शन घेतात. अतिशय पुरातन धार्मिक स्थळ म्हणून सालबर्डी हे ठिकाण ओळखलं जातं. त्यामूळे जिल्ह्यातून भाविक येथे येत असतात. मात्र 26 फेब्रुवारी ला सुरुवात होणाऱ्या यात्रेला हिवरखेड मार्गे सालबर्डी जाणे कठीण होणार आहे. प्रशासनाने या मार्गाची तातडीने दुरुस्ती करावी अशी मागणी ग्रामस्थांकडून केली जात आहे.



# शाळेच्या व्हांड्यात दारु पार्टी, कपडे काढून धिंगाणा आणि भिंतही पाडली

## हत्तीघाट येथील ज्ञानदीप माध्यमिक विद्यालयातील घटना

**महासागर प्रतिनिधी**
**परतवाडा,( दि.19 )**– परतवाडा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील आणि चिखलदरा तालुक्यातील हत्तीघाट येथे तीन दारुड्या युवकांनी ज्ञानदीप शाळेच्या व्हांड्यात दारु पार्टी केली, त्यानंतर कपडे काढून धिंगाणा घातला आणि शाळेची भिंतही पाडली. याप्रकरणी पोलीसात तक्रार देण्यात आली आहे.

रविवारी शाळेच्या सुटीचा दिवस असल्याने शाळेत कुणीही नव्हते. दुपारी 2 वाजताच्या दरम्यान चारचाकी वाहनाने तीन युवक आले. या युवकाने शाळेच्या व्हरांड्यात चक्क कपडे काढून गाडीतील गाण्याच्या तालावर ताल धरला, त्यानंतर दारू ढोसली, मोबाइलमध्ये सेल्फी घेतल्या आणि चक्क 45 फूट लांब असलेली स्वच्छता व प्रसाधनगृहाची भिंत लाथा हाणत पाडली. हत्तीघाट येथील ज्ञानदीप माध्यमिक विद्यालयात घडलेल्या या घटनेची फिर्याद मुख्याध्यापक एस.डी. गावंडे यांनी परतवाडा पोलिसात दिली आहे. पोलिसांनी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शिवप्रतीक एज्युकेशन अँड वेलफेअर सोसायटीद्वारा संचालित ज्ञानदीप माध्यमिक विद्यालय आहे. रविवारी सुट्टी असल्याने सोमवारी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सोमवारी नेहमीप्रमाणे शाळेत आले तेव्हा त्यांना स्वच्छता व प्रसाधनगृहाची तब्बल 45 फूट लांब आवार भिंत जमीनदोस्त झाल्याचे दिसून आले. बेलखेडा गावातील काही विद्यार्थ्यांनी या तीन युवकांना बघितल्याची माहिती पुढे आली आहे. घटनास्थळी दारूच्याही बाटल्या पडून होत्या. पोलीस आरोपींचा शोध घेत आहे.



# शिवरायांचे आठवावे रूप, शिवरायांचा आठवावा प्रताप!

**जिल्ह्यात शिवजयंती दणक्यात साजरी**

*महासागर टीम*
*अमरावती,( दि.19 )– सकलजनांचे दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती म्हणजे त्यांच्या रुपासह त्यांचा प्रताप पुन्हा एकदा आठविण्याचा दिवस. यंदाची शिवजयंती दरसालाप्रमाणे यंदाही संपुर्ण जिल्ह्यात दणक्यात साजरी करण्यात आली. व्याख्याने, शोभायात्रा, शिबीरे असे विविध कार्यक्रमांचे आयोजन या शिवजयंतीला करण्यात आले होते.*

## स्वराज्यातील राज्यकारभार हेच खरे सुशासन –आ. सुलभा खोडके

**अमरावती** – छत्रपती शिवाजी महाराज हे भारताच्या इतिहासातील एक महान योद्धा आणि कुशल प्रशासक होते. शिवरायांचे हे विचार आणि कार्य समतावादी व न्यायपूर्ण समाजव्यवस्था निर्माण करण्यासाठी आजही दीपस्तंभासारखे मार्गदर्शक स्वरूपाचे आहे. शिवराज्यातील अर्थ व्यवस्था, धर्मनिरपेक्ष धोरण, स्त्री–पुरुष समानता , शेती विकासाचे धोरण महत्वाचे असून प्रजा हित व रयतेचे कल्याण साधण्याकरिता महाराजांच्या काळातील राज्यकारभार हेच खरे सुशासन आहे. असल्याचे प्रतिपादन आ.सुलभा खोडके यांनी केले.

महाराष्ट्राचे आराध्य दैवत , हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या



19 फेब्रुवारी रोजी जयंती निमित्य आमदार खोडके यांनी शिवटेकडी स्थित शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्प मानवंदना करून अभिवादन केले. यावेळी आमदार महोदयांनी सर्व उपस्थित शिवप्रेमींना शिव जयंतीच्या शुभेच्छा दिल्या. शिवजयंती निमित्य शिवटेकडी सजली असल्याने त्या ठिकाणी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

## राहूल व्यायाम प्रसारक मंडळाकडून शिवाजी महाराजांना अभिवादन



**अमरावती**– येथील भूमिपुत्र कॉलनी स्थित राहुल व्यायाम प्रसारक मंडळाकडून हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करुन शिवाजी महाराजांना अभिवादन करण्यात आले. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष समाज भूषण मधुकरराव अभ्यंकर यांच्या अध्यक्षतेखाली तथा संस्था अध्यक्ष क्षितीज अभ्यंकर, संचालिका प्राध्यापक शुभांगी अभ्यंकर यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला.

या कार्यक्रमात प्रसंगी समर्थ अभ्यंकर व विहान अभ्यंकर यांनी शिवाजी महाराजांची वेशभूषा परिधान केली होती, जे विशेष आकर्षण ठरले. या कार्यक्रमाप्रसंगी संस्थेचे सहसचिव सतीश पुंडकर, प्राचार्य अविनाश पवार, प्रमोद भगत, जीवन फसाटे, गोरखनाथ पर्वतकर, आकाश वंजारी, कृष्णा शिरभाते, विकास फसाटे आदी मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते.

## छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयघोषाणे दुमदुमले शहर



**चांदुर रेल्वे** – रस्त्यांवर गल्ली बोळीत ठीकठिकाणी रांगोळ्या, डोक्यावर फेटे, हातात महाराजांचा भगवा झेंडा, सजलेल्या मोटार बाईक व डीजे च्या बरोबरीने होणारा महाराजांचा जयघोषाने चांदुर रेल्वे शहर दुमदुमले होते, आज छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त संपूर्ण शहरातून मोटर बाईक रॅली चे आयोजन शिव, शाहू, फुले, आंबेडकर विचार मंच च्या वतीने करण्यात आले होते.


यावेळी माजी आमदार वीरेंद्र जगताप यांच्या नेतृत्वात संपूर्ण शहरातून रॅली काढण्यात आली, शिवाजी नगर येथील महाराजांच्या पुतळ्याला हारार्पण करीत ही रॅली शिवाजी नगर, बस स्टँड, विरुळ चौक मार्गे, मिलिंद नगर, गांधी चौक, ते बाळासाहेब चौक व नंतर नगर परिषद पर्यंत ह्या रॅलीचा मार्गक्रम होता, यावेळी शहरातील महात्मा फुले, डॉ बाबासाहेब आंबेडकर, चंद्रशेखर आझाद यांच्या पुतळ्यांना हारार्पण करण्यात आले. यावेळी विचार मंचचे अध्यक्ष डॉ सागर वाघ,बाजार समितीचे गणेश आरेकर, माजी जिप अध्यक्ष नितीन गोंडाने, पं.स.सदस्य अमोल होले, माजी नगराध्यक्ष प्रा.प्रभाकर वाघ, निवास सूर्यवंशी, परीक्षित जगताप, गोविंदराव देशमुख, मुरलीधर सरड, शेळके, मिलिंद गुजरकर, अरविंद गुरदे, विवेक राऊत, राजू लांजेवार, हर्षल वाघ, रुपेश पुडके, सुमेध सरदार, नरेंद्र मेश्राम, सागर दुर्योधन, देवानंद खुणे, पप्पू माने, महेश कलावटे, राजू लांजेवार, प्रफुल कोकाटे,अनिस सौदागर, सारंग देशमुख, सनी सावंत, वैभव मलवार, टिल्लू ठाकरे, सारंग देशमख, श्रीकांत माने, अशोक चौधरी, राहूल कोरडे, बंटी माकोडे, रोहित बरडे, सागर गरुड, भूषण सरदार, भूषण काळे, सागर घटारे यांच्यासह तालुक्यातील अनेक शिवप्रेमी उपस्थित होते.

### लाख रुपयांच्या औषधी ग्रामीण रुग्णालयाला भेट

शिवजयंती उत्सव साजरा करताना नाच गाणे परंपरेला फाटा देत सकारात्मक कामातून महाराजांना आदरांजली वाहायची म्हणून ग्रामीण रुग्णालयात जीवनावश्यक औषधांचा तुटवता लक्षात घेता 1 लाख रुपयांचे औषध सामग्री काँग्रेस कमिटी व शिव शाहू फुले आंबेडकर विचार मंच तर्फे ग्रामीण रुग्णालयाला भेट स्वरूपात देण्यात आली.

## मोहम्मद शोएब अब्दुल रज्जाक यांचे निधन

**महासागर प्रतिनिधी**
**अचलपूर, ( दि.19 )**– अचलपूर शहरातील कसदपुरा येथील सामाजिक कार्यकर्ते मोहम्मद शोएब अब्दुल रज्जाक यांचे हृदयविकाराच्या झटक्याने दुर्दैवी निधन झाले. त्यांच्या अचानक जाण्याने शहरात शोककळा पसरली आहे. मोहम्मद शोएब हे शांत स्वभावाचे व समाजसेवेसाठी ओळखले जाणारे व्यक्ती होते.



त्यांना घरी अचानक हृदयविकाराचा झटका आला, त्यानंतर तातडीने रुग्णालयात नेण्यात आले, मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. त्यांच्या निधनाची बातमी शहरभर पसरताच त्यांच्या चाहत्यांचा मोठा जमाव घरासमोर उसळला. बुधवारी दुपारी त्यांची जानाजेची नमाज अदा करण्यात आली व नंतर त्यांचेवर अंत्यसंस्कार पार पडले. त्याचे मागे आई–वडील, पत्नी आणि दोन मुली असे कुटूंब आहे.त्यांच्या निधनामुळे समाजसेवक, मित्रपरिवार आणि नातेवाईकांनी दुःख व्यक्त केले व त्यांच्या आत्म्याच्या शांतीसाठी प्रार्थना केली.



## मालमत्ता जप्ती, करासाठी मनपाची मोहीम

### दिवसभरात 1.24 कोटी कराची वसुली

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.19 )** – महापालिका प्रशासनाने प्रशासनाने उत्पन्न वाढीसाठी मोहीम उघडली आहे. यानुसार मालमत्ता जप्तीची कारवाई आणि मालमत्ता करासाठी कठोर पावले उचलली आहेत. पाचही झोननिहाय मालमत्ता कर जप्ती मोहीमेंतर्गत प्रत्येक प्रभागात कारवाईची प्रक्रीया आरंभली आहे, मंगळवारी 18 फेब्रुवारीपासून पाचही झोनमध्ये दिवसभरात 1.24 कोटी रु. कर वसुल केल्याची माहिती मनपा प्रशासनाद्वारे देण्यात आली. अनेक वर्षांपासून पाठपुरावा व नोटीस देऊनही थकबाकीदार हे थकीत भरत नसल्याने झोन क्र. 1 ते 5 च्या सहायक आयुक्तांनी वॉरंट बजावले. त्यानंतर मालमत्ता जप्तीचे आदेश दिले.

जनजागृती, जप्ती मोहीम, नोटीस अशा विविध उपाययोजनांसोबतच पोस्टाद्वारे तसेच ज्या मालमत्ता करधारकांचे रजिस्ट्रेशन असलेल्या करदात्यांना ई–मेल, मोबाईलवर संदेश पाठवून देयक पाठवण्यात आले आहेत. तसेच थेट वसुलीसाठी जप्तीच्या नोटीस देण्याकरिता प्रभागांमध्ये वसुली पथके तयार करण्यात आली आहेत. तसेच नागरिकांना काही मालमत्ताकरांबाबत अडचणी असल्यास महानगरपालिकेशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. उत्तर झोन क्र.1 रामपुरी कॅम्प येथे 24.70 लाख, मध्य झोन क्र.2 राजापेठ येथे 21.63 लाख, पुर्व झोन क्र.3 दस्तुरनगर येथे 55.60 लाख, दक्षिण झोन क्र.4 बडनेरा येथे 9.60 लाख, पश्चिम झोन क्र.5 भाजीबाजार येथे 12.69 लाख असा एकूण 1.24 कोटी मालमत्ता कर वसुल करण्यात आला आहे.

## गुरूकुल संस्थेतर्फे शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजर

**बडनेरा** – येथील गुरूकुल ज्ञानमंदिर बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्याम बडनेरकर हे होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून श्रीकांत रहाटगांवकर उपस्थित होते. विद्यार्थी व पालकांनी शाळेच्या परिसरात बाल शिवाजी, माँ जीजाऊ आणि मावळ्यांच्या वेशभूषेत मिरवणूक काढली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे हारार्पण व पुजन करून वंदन करण्यात आले. याप्रसंगी हर हर महादेव, जय भवानी जय शिवराय, छत्रपती शिवाजी महाराज की जय, भारत माता की जय असे जयघोष करण्यात आले.पालकांतर्फे प्रियंका शेरेवार, हेमा चुरागडे यांनी स्त्री शक्ती बद्दल शिवाजी महाराजांची विचार प्रणाली व त्यांचा आदर यावर



आपले विचार व्यक्त केले. सायली शेरेवारने सुद्धा भाषण व गीत सादर केले. हर्ष चुरागडे या विद्यार्थ्यांला अभ्यासातील प्रगतीबाबत गुलाबपुष्प व शिव प्रतिमा भेट देऊन त्यांचे कौतुक करण्यात आले. प्रमुख अतिथी श्रीकांत रहाटगांवकर यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनातील महत्वाच्या प्रसंगाची माहिती दिली व बालवाडीत राबविल्या जाणार्या उपक्रमांचे कौतुक केले. कार्यक्रमाचे संचालन वर्षा बडनेरकर यांनी तर आभारप्रदर्शन सारिका चामट यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सारंग बडनेरकर, नंदन बडनेरकर, सुरज घरडे, अजय तायडे, अमोल भगत, पुजा डोबरे, प्रतिक्षा लाड, अमोल पोकळे, आशिष चिंचोळकर, सागर वयले, मयुरी लाड, अंकीता बारापात्रे, मिना खंडारे, रूपाली बनकर, प्रतिक राऊत यांनी प्रयत्न केले.

## शिवजयंतीनिमित्त भव्य शोभा यात्रा व महाआरती संपन्न

**मोर्शी** – शिवतीर्थ प्रतिष्ठान वशिव जयंती उत्सव समिती, मोर्शी द्वारा आयोजित शिवजयंती निमित्य 19 फेब्रुवारी 2025 भव्य शोभायात्रा आकर्षक देखाव्यासह काढण्यात आली.शिवतीर्थ प्रतिष्ठान व शिवजयंती उत्सव समिती मोर्शीचे वतीने आयोजित शोभायात्रा वृंदावन मंगल कार्यालय, सिंभोरा रोड मोर्शी येथून सायंकाळी सहा वाजता निघालेली ही शोभायात्रा सिंभोरा चौकात आल्यानंतर राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे यांचे हस्ते शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे पूजन करून शिवप्रतिमेची महाआरती करण्यात आली. यावेळी कार्यकर्ते उपस्थित होते.



ही शोभायात्रा जयस्तंभ चौक मार्गे श्री समर्थ रामजीबाबा मंदिरापर्यंत नेण्यात आली. यामध्ये अमरावतीचे राम राज्य ढोल ताशा पथक, लेझीम, मलखांब पथक वारकरी दिंडी,आदिवासी नुत्य, व छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित आकर्षक देखावे या शोभेयात्रे मध्ये दिसून आलेत. हजारो युवकांनी य महाआरतीत सहभाग घेऊन मोठ्या प्रमाणत छत्रपती शिवाजी महाराजांचा जयजयकार केला. शिवतीर्थ प्रतिष्ठान व शिव जयंती उत्सव समिती, मोर्शी द्वारा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

## पी.आर.पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप मध्ये शिवजयंती सोहळा

**अमरावती**– पी.आर.पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप, अमरावती येथे विद्यार्थ्यांच्या अंतर्नाद क्लब, सोशल मीडिया क्लब, आणि सांस्कृतिक क्लबच्या वतीने महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती श्री शिवाजी महाराज यांच्या जयंतीचा सोहळा अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. या सोहळ्यात विद्यार्थ्यांनी महाराष्ट्रीय पोशाख परिधान करून ढोल पथक वाजवले, लेझीम खेळले, आणि पथनाट्य सादर केले. त्याचबरोबर, माँसाहेब जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज, आणि मावळ्यांच्या



भूमिकेतील विद्यार्थ्यांनी प्रभावी सादरीकरण केले. छत्रपती शिवाजी महाराज यांची भव्य मिरवणूक महाविद्यालयाच्या परिसरात काढली, ज्यामुळे संपूर्ण परिसर भगवामय झाला. यानंतर अफजल खान वध नाटिका सादर करत महाराजांचा जयघोष करण्यात आला, आणि विद्यार्थ्यांनी महाराजांचा पोवाडा व लाठी काठी प्रयोग सादर केले. प्रसिद्ध व्याख्याते सनी रबडे यांचे



प्रेरणादायी व्याख्यान विद्यार्थ्यांच्या मनामध्ये नव चैतन्य व उत्साह निर्माण करणारे ठरले. कार्यक्रमाच्या समारोपावेळी संस्थेचे अध्यक्ष प्रविण पोटे पाटील व उपाध्यक्ष श्रेयस पोटे पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे पूजन करून फुलांचा हार अर्पण केला व महाआरती केली.

## सालबर्डी, कोंडेश्वर यात्रेकरिता 950 बसफेऱ्याचे नियोजन

### 23 फेब्रुवारी ते 2 मार्च दरम्यान आठही आगारातून बसेस सुटणार







**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 19 )** – महाशिवरात्री निमित्त जिल्ह्यातील सालबर्डी व कोंडेश्वर येथे भक्तांची गर्दी पाहता एसटी महामंडळाच्या वतीने त्यांना सुविधा देण्याकरिता अतिरिक्त बसेस सोडण्याचे नियोजन केले आहे. 23 फेब्रुवारी ते 2 मार्चदरम्यान आठही आगारातून सुमारे 950 च्या वर बस फेऱ्या या तिर्थस्थानी सोडण्यात येणार असल्याची माहिती विभागीय नियंत्रक नीलेश बेलसरे यांनी दिली.

महाशिवरात्री निमित्त जिल्ह्यातील सालबर्डीला विदर्भातील हजारो भाविक भक्तांचा जनसागर लोटतो. त्यामुळे तेथे जाण्याकरिता भक्तांना सुविधा नसल्याने त्यांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होते. त्यामुळे आठही बसस्थानकांमध्ये 10 बसेस उपलब्ध असणार आहे. यंदा सुमारे 32 लाखांच्या उत्पन्नाचे उद्दिष्ट महामंडळाकडून ठरविण्यात आले आहे.

महिलांसह अन्य योजनेतील प्रवाशांना सवलती कायम राहणार आहेत. इतर प्रवासात महिलांना भाड्यात 50 टक्के सवलत, यासह ज्येष्ठ व अमृत नागरिकांकरिता जी सवलत शासनाकडून दिली जात आहे. त्या सर्व सुविधांचा लाभ या यात्रा महोत्सवाच्या प्रवासात दिल्या जाणार असल्याचे सांगण्यात आले.

### असे राहतील बसचे दर

अमरावती ते सालबर्डी 122 रुपये, मोर्शी ते सालबर्डी–दापोरी मार्ग 26 रुपये,मोर्शी ते सालबर्डी–पाळा मार्ग 21 रुपये,चांदूरबाजार ते सालबर्डी–मोर्शी–दापोरी मार्ग 81 रुपये, परतवाडा ते सालबर्डी–चांदूर–मोर्शी–दापोरी 132 रुपये, वरूड ते सालबर्डी–हिवरखेड मार्ग 51 रुपये असे दर राहणार आहे.




# यकृताकडे दुर्लक्ष केल्यास गंभीर आजार



यकृत हा आपल्या शरीरातील सर्वात महत्त्वाचा अवयव आहे. ते अनेक महत्त्वपूर्ण कार्ये करते. विशेषतः शरीरातील घाण काढून टाकण्याचे काम ते करते. शरीर पूर्णपणे डिटॉक्स करण्यास मदत करते; पण जेव्हा यकृत खराब होऊ लागते, तेव्हा ते शरीराच्या गरजेनुसार कार्य करू शकत नाही. जेव्हा यकृत कमकुवत होते, तेव्हा भूक लागत नाही, उलट्या होतात आणि सतत अशक्तपणा जाणवतो. यकृत दीर्घकाळ खराब राहिल्यास लिव्हर सिरॉसिससारख्या गंभीर आजारांचा धोकाही वाढतो.

जेव्हा यकृतामध्ये कोणतीही समस्या उद्भवते, तेव्हा अशी काही चिन्हे सुरुवातीलाच दिसू लागतात. त्यांची ओळख करून यकृताचे नुकसान टाळू शकता. कोणत्याही गंभीर आजारामागील सर्वात मोठे कारण म्हणजे चुकीच्या खाण्याच्या सवयी.

**आरोग्य चर्चा**

अशा परिस्थितीत आहारात सुधारणा करा. यकृत डिटॉक्स करण्यासाठी बीटरूट, हळद, पालेभाज्या आणि लसूण यांसारख्या पदार्थांचा समावेश करा.

**शरीर हायड्रेटेड ठेवा** : जितके जास्त पाणी प्याल तितके शरीर अधिक हायड्रेटेड होईल आणि शुद्धीकरणाला चालना देण्यासाठी लिंबू पाणी भरपूर प्या.

**तणावापासून दूर राहा**

तणाव आणि अतिविचार शरीराचा नाश करतात. त्यामुळे तणाव कमीत कमी ठेवा. तणाव कमी करण्यासाठी योग किंवा ध्यानाचा सराव करा

**अल्कोहोल टाळा** : तुम्हाला यकृताचा आजार असेल तर दारूपासून दूर राहा. यकृतावरील ओझे कमी करण्यासाठी अल्कोहोल, प्रक्रिया केलेले पदार्थ आणि साखरयुक्त पेये टाळा.


**– डॉ. पोपट ठाणगे**

**यकृताच्या नुकसानीची लक्षणे**

* त्वचा किंवा डोळे पिवळे होणे
* ओटीपोटाचा विस्तार
* ओटीपोटाच्या वरच्या उजव्या बाजूला आणि उजव्या खांद्यावर वेदना
* डोळे किंवा त्वचा पिवळसर होणे
* वारंवार मळमळ
* पचन बिघडणे
* सतत थकवा

# देशात मानवी शरीरात प्रथमच यांत्रिक हृदय

देशात पहिल्यांदाच माणसाच्या शरीरात यांत्रिक हृदयाचा ठोका सुरू झाला आहे. यांत्रिक हृदय प्रत्यारोपणाने एका महिला रुग्णाला नवजीवन मिळाले आहे. दिल्ली कँट आर्मी हॉस्पिटलने प्रथमच 'लेफ्ट व्हेंट्रिक्युलर असिस्ट डिव्हाइस' (एलव्हीएडी) रोपण करून इतिहास रचला आहे. ही प्रक्रिया हार्टमेट ३ उपकरण वापरून केली जाते.



**आरोग्य वेध**

संरक्षण मंत्रालयाने सांगितले, की शेवटच्या टप्प्यातील हृदयविकाराच्या रुग्णांसाठी हे उपकरण वरदानापेक्षा कमी नाही.

एका माजी सैनिकाच्या ४९ वर्षीय पत्नीला यांत्रिक हृदयाचे रोपण करण्यात आले. गेल्या दोन वर्षांपासून ते हृदय प्रत्यारोपणाच्या प्रतीक्षेत होते. त्याची प्रकृती हळूहळू खालावत चालली होती. त्यानंतर 'लेफ्ट व्हेंट्रिक्युलर असिस्ट डिव्हाइस' म्हणजेच मेकॅनिकल हार्ट रोपण करण्याचा निर्णय घेण्यात आला.

महिला रुग्णाच्या डाव्या वेंट्रिक्युलरमधून रक्त पंप करणे जवळपास बंद झाल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. त्यानंतर त्यांचा जीव वाचवण्यासाठी हृदय प्रत्यारोपण हा एकमेव पर्याय होता. हार्टमेटच्या मदतीने रक्त पंपिंग पुन्हा एकदा सुधारता येते. रुग्णाचा जीव वाचवण्यासाठी रुग्णालयाने हे करण्याचा निर्णय घेतला. त्याच्या स्थापनेनंतर, स्त्रीला हृदय प्रत्यारोपणाची गरज भासणार नाही, कारण ते दीर्घकाळ कार्य करेल आणि तिला निरोगी ठेवेल.

यांत्रिक हृदय बसवल्यानंतर महिला रुग्णाची प्रकृती आता स्थिर आहे. सध्या ती डॉक्टरांच्या देखरेखीखाली असून वेगाने बरी होत आहे. हे यश आर्मी हॉस्पिटलच्या उच्च दर्जाच्या वैद्यकीय पथकासाठी मोठी उपलब्धी आहे. यामुळे भविष्यात हृदयावरील उपचाराचे अनेक पर्याय समोर येऊ शकतात. भारतात पहिल्यांदाच यांत्रिक हृदयाची घटना समोर आली आहे; मात्र जगात यापूर्वीही असे प्रयोग झाले आहेत. अमेरिकेसह जगातील अनेक देशांमध्ये हे उपकरण आधीच वापरले जात आहे. जगभरातील १८ हजारांहून अधिक लोकांना ही उपकरणे बसवण्यात आली आहेत आणि ती पूर्णपणे निरोगी आहेत. या सर्वांमध्ये हे यंत्र चांगले काम करत आहे.

**– डॉ. अजिंक्य बोऱ्हाडे**

# लहान वयातील मुलींनाही 'युरिन इन्फेक्शन'

एखादा आजार पूर्वी विशिष्ट वयातच होत असे; मात्र आजकालची बदलती जीवनशैली आणि बदलत्या काळानुसार लहान मुली, तरुणींमध्ये विविध गंभीर आजारांचा धोकाही वाढला आहे. आजकालची परिस्थिती पाहता 'युरिन इन्फेक्शन' हा असा एक आजार आहे, ज्याची प्रकरणे खूप वाढत आहेत. जरी हा संसर्ग सामान्यत: स्त्रियांमध्ये होत असला, तरी काही प्रमाणात पुरुषांमध्येदेखील त्याची लक्षणे दिसतात. आता लहान वयातील मुली, तरुणींमध्येही या संसर्गाची प्रकरणे लक्षणीय प्रमाणात वाढत आहेत. आजकाल

**काळजी घ्या**

तरुणींमध्ये 'युरिन इन्फेक्शन'ची समस्या झपाट्याने वाढत आहे. ही एक सामान्य; परंतु गंभीर आरोग्य समस्या आहे. ती संसर्गामुळे पसरते आणि त्यावर वेळीच उपचार न केल्यास इतरही अनेक समस्या उद्भवू शकतात. 'युरिन इन्फेक्शन'ची प्रकरणे पाच वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलींमध्ये आढळतात. शाळेत जाणाऱ्या मुलींमध्ये याचे प्रमाण वाढण्यामागे अनेक कारणे आहेत.

आजकाल लघवीशी संबंधित आजार खूप वाढले आहेत. हे कोणत्याही ऋतूत कोणालाही होऊ शकत असले तरी स्त्रियांना याचा धोका जास्त असतो. आजकाल तरुण मुलींमध्येही 'यूटीआय'ची प्रकरणे वाढू लागली आहेत. शाळेत जाणाऱ्या मुली साधारणपणे शाळेत कमी पाणी पितात, त्यामुळे हा आजार वाढत आहे. शाळेत जाणाऱ्या मुलींनी लघवी दाबून धरल्याची प्रकरणे वाढत आहेत. त्यामुळे लघवीचे संक्रमण होते. लघवी रोखून ठेवल्याने मूत्राशयातील बॅक्टेरिया वाढतात. अनेक वेळा शाळेतील स्वच्छतागृहे स्वच्छ नसतात. त्या अस्वच्छ आसनांचा वापर करणेदेखील 'युरिन इन्फेक्शन'चे कारण असते.

पालकांनी आपल्या मुलींना घरातच



चांगल्या सवयी शिकवल्या पाहिजेत. त्यांना पाणी पिण्याचा सल्ला द्या, दररोज योग्य प्रमाणात पाणी प्या. त्यांना शौचालयाचा योग्य वापर कसा करायचा ते शिकवा. तसेच त्यांना संवेदनशील भागांच्या स्वच्छतेबाबत सांगा.

**– डॉ. मेघा दळे**

**नवसंशोधन**


## यांच्या एकत्रीकरणामुळे...




'ड' जीवनसत्त्व आणि कॅल्शियम हे दोन्ही घटक शरीरासाठी आवश्यक असतात. या दोन्ही घटकांमुळे हाडांना बळकटी मिळते. या दोन घटकांची कमतरता दूर करण्यासाठी पूरक औषधं दिली जातात. मात्र 'ड' जीवनसत्व आणि कॅल्शियमयुक्त औषधं (सप्लिमेंट्स) एकाच वेळी घेणं धोक्याचं ठरू शकतं, असं तज्ज्ञांचं म्हणणं आहे. याबाबतचं संशोधन नुकतंच प्रसिद्ध करण्यात आलं. या औषधांच्या एकत्रीकरणामुळे हृदयाचा पक्षाघात (हार्ट स्ट्रोक) होण्याचा धोका असल्याचं तज्ज्ञ सांगतात. विविध प्रकारच्या १६ सप्लिमेंट्सचा तसंच आहारातल्या बदलांचा हृदयाच्या आरोग्यावर होणाऱ्या परिणामांबाबत यावेळी संशोधन करण्यात आलं. कॅल्शियम आणि 'ड' जीवनसत्त्वाच्या सप्लिमेंट्स एकत्रित घेतल्याने पक्षाघाताचा धोका १७ टक्क्यांनी वाढत असल्याची बाब यातून समोर आली आहे.

**दंतारोग्य**

## तोंडाला दुर्गंधी येतेय?



तोंडाला येणारी दुर्गंधी नकोशी वाटते. दातांमध्ये अडकून बसलेले अन्नकण सडल्यामुळे मोठ्या प्रमाणावर बॅक्टेरियांची निर्मिती होते आणि तोंडाला दुर्गंधी येऊ लागते. ही दुर्गंधी कमी करण्यासाठी अनेक जण माउथ वॉशचा वापर करतात. पण बरेचदा माउथ वॉशही परिणामकारक ठरत नाही. तोंडाची दुर्गंधी घालवण्यासाठी भरपूर पाणी प्यायला हवं, असं डॉक्टरांचं म्हणणं आहे. पाण्यामुळे तोंडातला ओलावा टिकून राहिल्याने बॅक्टेरियाचं प्रमाण कमी होतं, असं तज्ज्ञ सांगतात. तोंडांची दुर्गंधी टाळण्यासाठी नियमित चूळ भरायला हवी. झोपण्याआधी चहा-कॉफीचं सेवन टाळावं. तसंच जीभ नीट स्वच्छ करावी. दातांमध्ये अडकलेले अन्नकण काढून टाकणं गरजेचं आहे. रात्री दात घासल्यामुळे मुखदुर्गंधी कमी व्हायला मदत होते.

**डोळ्यांचं आरोग्य**

## डोळ्यांकडे दुर्लक्ष नको



मधुमेहाची बरीच लक्षणं पटकन लक्षात येत नाहीत. काही वेळा आपण या लक्षणांकडे दुर्लक्ष करतो. मात्र आपले डोळे बरीच गुपितं उलगडत असतात. मधुमेहाचं निदानही डोळ्यांच्या माध्यमातून होऊ शकतं. मधुमेहामुळे शरीरातल्या रक्तवाहिन्या प्रभावित होतात. याचे दृश्य परिणाम डोळ्यात दिसू लागतात. मधुमेहामुळे बऱ्याच गुंतागुंती निर्माण होतात. त्यापैकी एक म्हणजे डायबेटिक रेटिनॉपॅथी. यामुळे कायमस्वरुपी अंधत्व येऊ शकतं. रक्तातल्या साखरेच्या प्रमाणामुळे डोळ्यांमधल्या रेटिनावर विपरित परिणाम होतो. त्यामुळे अंधुक दिसणं हे सुद्धा मधुमेहाचं महत्त्वाचं लक्षण असतं. म्हणूनच अचानक अंधुक दिसू लागलं तर डोळ्यांसोबतच रक्ताचीही तपासणी करा.

# ग्रीन टीच्या अतिसेवनामुळे...

चहा-कॉफीला आरोग्यदायी पर्याय म्हणून अनेकजण ग्रीन टी पितात. बाजारात विविध प्रकारचे, चवींचे ग्रीन टी उपलब्ध आहेत. ग्रीन टी आरोग्यदायी असला तरी तो प्रमाणातच प्यायला हवा. ग्रीन टीच्या अतिरेकामुळे होणाऱ्या दुष्परिणामांविषयी...



ग्रीन टीच्या अतिरेकामुळे यकृताच्या कार्यावर परिणाम होतो. यकृताचं कार्य मंदावून जंतूसंसर्गाचा धोका वाढतो. युरोपियन फूड सेफ्टी ॲथोरिटीने केलेल्या संशोधनातून ही बाब समोर आली आहे. त्यामुळे दिवसभरात एक ते दोन कप ग्रीन टी पिणं योग्य ठरतं, असं तज्ज्ञ सांगतात. ग्रीन टीच्या अतिसेवनामुळे दातांवर डाग पडतात. म्हणूनच ग्रीन टी प्रमाणात

**आहार तंत्र**

पिण्यासोबतच त्याचा दर्जा उत्तम असणंही गरजेचं ठरतं. ग्रीन टीमधल्या टॅनिन या घटकामुळे शरीराच्या लोह शोषून घेण्याच्या क्षमतेवर परिणाम होऊन शरीरात लोहाची कमतरता निर्माण होऊ शकते. त्यामुळे जेवताना ग्रीन टी पिऊ नये.

# बटाटा वेफर्स खाल्ल्याने...

लहान मुलांना बटाटा वेफर्स खूप आवडतात. मुलांना खाऊ म्हणून हेच वेफर्स दिले जातात. बाजारात विविध ब्रँड्सचे वेफर्स मिळतात. मुलंही हे वेफर्स खाण्याचा हट्ट धरून बसतात. मात्र प्रत्यक्षात अशा वेफर्सच्या सेवनामुळे मुलांचं आरोग्य बिघडू शकतं. स्थूलपणासोबतच काही गंभीर आजार जडू शकतात. पाकीटबंद वेफर्सच्या सेवनामुळे होणाऱ्या घातक परिणामांविषयी...

**आपण कुठे चुकतो?**

पाकीटबंद वेफर्समध्ये कॅलरी आणि फॅट्सचं प्रमाण बरंच जास्त असतं. वेफर्समध्ये बरेच प्रिझर्व्हेटिव्हज घातलेले असतात. यामुळे स्थूलपणा वाढतो. २०१५ मधल्या संशोधनातून तेलकट बटाटा वेफर्समुळे मुलांमधला स्थूलपणा वाढत असल्याची बाब समोर आली आहे. अशा वेफर्सच्या अतिसेवनामुळे कमी वयात मधुमेह, हृदयविकार जडू शकतात, असंही काही संशोधनांमधून समोर आलं आहे. बटाटा वेफर्सचं सेवन कॅन्सरलाही कारणीभूत ठरू शकतं.



बटाटा वेफर्समध्ये फारशी पोषणमूल्यं नसतात. त्यातच यात मिठाचं म्हणजे सोडियमचं प्रमाण खूप जास्त असल्यामुळे उच्च रक्तदाबासारखे विकार डोकं वर काढू शकतात. यातल्या ट्रान्स फॅट्समुळे हृदयाचं आरोग्य धोक्यात येतं. त्यामुळे मुलांना पाकीटबंद बटाटा वेफर्स न देणंच योग्य ठरतं.

# वजन वाढवायचं तर...

काही जणांचं वजन खूप कमी असतं. आयुर्वेदानुसार वात दोष असणाऱ्यांमध्ये चयापचयाची क्रिया खूप वेगाने होत असल्यामुळे त्यांचं वजन वाढतंच नाही. वजन वाढण्यासाठी आयुर्वेदिक उपचार देण्याआधी रुग्णाची नाडी तपासली जाते. वेगवेगळ्या पद्धतींनी निदान केल्यानंतरच उपचार सुरू होतात.

वजनवाढीच्या आयुर्वेदिक उपचारांविषयी..

वजन वाढवण्याच्या दृष्टीने च्यवनप्राश उपयुक्त ठरतो. च्यवनप्राशमुळे रोगप्रतिकारक शक्ती वाढते. कोणत्याही वयोगटातली व्यक्ती च्यवनप्राश खाऊ शकते. यातून शरीराला आवश्यक ती पोषणमूल्यं मिळतात. वजन वाढवण्याच्या कामी शतावरी कल्पही उपयुक्त

**आयुर्वेद आणि विकार**

ठरतं. यासोबतच याचे इतरही काही लाभ आहेत. शतावरी कल्पमुळे डोळे, स्नायू यांचं आरोग्य राखलं जातं.वसंत कुमार रस हे सुद्धा अत्यंत लाभदायी औषध आहे. यामुळे रोगप्रतिकारकशक्ती वाढते. अवयवांना बळकटी मिळते. अश्वगंधा हे सुद्धा अत्यंत गुणकारी औषध आहे. अश्वगंधामुळे शरीर विविध विकारांचा अधिक सक्षमपणे सामना करतं. पचनशक्ती सुधारते. अश्वगंधामध्ये ताण कमी करण्याचे गुणधर्म असतात. जेष्ठमधामुळे शरीराला आवश्यक ती पोषणमूल्यं मिळतात. यासोबतच दररोज ३० ग्रॅम मनुका खाल्ल्याने वजनवाढीला चालना मिळते. आहारात दुग्धजन्य पदार्थांचं प्रमाण वाढवता येईल.



**आजीबाईचा बटवा**

## गुणकारी दालचिनी

दालचिनी हा अत्यंत गुणकारी असा मसाल्याचा पदार्थ आहे. यातल्या अँटीऑक्सिडंट्समुळे फ्री रॅडिकल्सचे दुष्परिणाम कमी होतात. यात दाह कमी करणारे गुणधर्म असतात. याशिवाय यातले अनेक घटक बॅक्टेरियाविरोधी म्हणून काम करतात. तर अशी ही दालचिनी पदार्थाची चव तर वाढवतेच शिवाय विविध रोगांवरही प्रभावी ठरते. 'पॉलिसिस्टिक ओव्हरियन सिंड्रोम' हा विकार सध्या महिलांमध्ये मोठ्या प्रमाणावर



आढळतो. दालचिनीच्या सेवनाने या विकाराला आळा घालता येतो.

दालचिनीमुळे रक्तातल्या साखरेचं प्रमाण नियंत्रणात रहातं. त्यामुळे दालचिनी हे मधुमेहींसाठी वरदान समजलं जातं. दालचिनीच्या सेवनामुळे विविध प्रकारचे जंतूसंसर्ग टाळता येतात. वजन कमी करणाऱ्यांसाठीही दालचिनी उपयुक्त ठरू शकते. म्हणूनच आहारात दालचिनीचा समावेश करायला हवा.

# आपल्याकडे असा टॅक्सच नाही

## 'छावा' करमुक्त करण्याच्या मागणीवर फडणवीसांचे स्पष्टीकरण



■ महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. १९ :

अभिनेता विकी कौशलची प्रमुख भूमिका असलेला 'छावा' चित्रपट १४ फेब्रुवारी रोजी प्रदर्शित झाला. सिनेमाने प्रेक्षकांना वेड लावले आहे. चित्रपट पाहण्यासाठी चित्रपटगृहांमध्ये लोक गर्दी करत आहेत.

त्यातच आता हा चित्रपट टॅक्स फ्री करण्याची मागणी होत आहे. चित्रपट टॅक्स फ्री करण्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोठे विधान केले आहे. महाराष्ट्रामध्ये करमणूक कर हा २०१७ सालीच रद्द करण्यात आला आहे. त्यामुळे अशी माफी देण्यासाठी आपल्याकडे असा करच नाही, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

छत्रपती संभाजी महाराज यांची शौर्यगाथा उलगडून दाखवणारा छावा चित्रपट गत आठवड्यात प्रदर्शित झाला. तेव्हापासून हा सिनेमा हाऊसफुल्ल जात आहे. अनेकांना त्याचे तिकिटही भेटत नसल्याचे दिसून येत आहे.

छावा चित्रपटाने अवघ्या चार दिवसांत १४५ कोटींचा गल्ला जमवला आहे. या दरम्यान, छावा चित्रपट टॅक्स फ्री करण्याची मागणी होत आहे. या मागणीबाबत बोलताना त्यांनी उपरोक्त माहिती दिली. यावेळी फडणवीस यांनी छत्रपती संभाजी महाराज यांच्या पराक्रमाची गाथा चित्रपटाच्या माध्यमातून दाखवल्याबद्दल चित्रपट निर्मात्यांचे अभिनंदनही केले आहे.

छत्रपती संभाजी महाराज ज्यांचे शौर्य, विरता आणि विद्वत्ता प्रचंड होती, पण इतिहासाने त्यांच्यावर मोठा अन्याय केला. ज्यांच्याबद्दल ह्यदेश धरम पर मिटने वाला, शेर शिवा का छावा था। महा पराक्रमी परम प्रतापी, एक ही शंभू राजा था, असे म्हटले गेले त्यांच्यावर अतिशय चांगला, इतिहासाशी कुठलीही प्रतारणा न करता ऐतिहासिक असा सिनेमा तयार झाला आहे. याचा मला आनंद आहे. त्याबद्दल सिनेमाचे निमार्ते, निर्देशक आणि प्रमुख भूमिका करणारे विकी कौशल यांचे मनापासून अभिनंदन करतो, असे फडणवीस म्हणाले.

फडणवीस यांनी सांगितले की, मोठ्या प्रमाणात मागणी होत आहे की, हा सिनेमा टॅक्स फ्री करा. पण मी महाराष्ट्रातील जनतेला सांगू इच्छितो की, इतर राज्य जेव्हा चित्रपट टॅक्स फ्री करतात तेव्हा जो करमणूक कर असतो तो माफ केला जातो. महाराष्टाने २०१७ सालीच निर्णय घेतला आणि महाराष्ट्रात करमणूक कर हा नेहमीकरिता रद्द केला आहे. आपल्याकडे (महाराष्ट्रात) करमणूक कर नाही. त्यामुळे अशी माफी देण्यासाठी असा करच आपल्याकडे नाही. चित्रपटाच्या प्रमोशनकरिता किंवा छत्रपती शंभू राजेंचा इतिहास हा प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहचवण्यासाठी आपल्याला काय चांगले करता येईल ते आपण करू, असेही ते म्हणाले.

**अपमान करणाऱ्यांना त्यांची जागा दाखवू**

छत्रपती शिवाजी महाराज आणि संभाजी महाराज यांचा अपमान करणाऱ्या अभिनेत्याबद्दल फडणवीस म्हणाले की, अपमान करणाऱ्यांना त्यांची जागा आम्ही दाखवू, अशा प्रकारे कोणी वागत असेल तर सरकारही माफ करणार नाही.

# आदिवासी समाजासाठी जिल्हानिहाय वेगळी योजना

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १८ :



आदिवासी समाजासाठी राज्य शासनाकडून कोट्यावधींचा निधी खर्च करून विविध प्रकल्प राबवले जातात. परंतु आजही काही भागातील आदिवासी विविध समस्यांना तोंड देत आहे. या आदिवासी बांधवांसाठी आदिवासी कल्याण मंत्री प्रा. डॉ. अशोक उईके यांनी नागपुरात महत्वाची घोषणा केली आहे. त्यानुसार आदिवासी समाजसाठी जिल्हानिहाय काही नावीन्य प्रकल्पाबाबत त्यांनी माहिती दिली.

नागपुरातील प्रेस क्लबमध्ये बुधवारी झालेल्या पत्रकारांशी वातालीप या कार्यक्रमात ते बोलत होते. प्रा. डॉ. अशोक उईके म्हणाले, एकेकाळी आदिवासी विभाग व समाज कल्याण विभाग एकच होते. परंतु १९८३- ८४ दरम्यान हे दोन्ही विभाग वेगवेगळे झाले.

आदिवासी बांधवांना न्याय मिळावा म्हणून आदिवासी खात्यात स्वतंत्र अर्थसंकल्पीय तरतुद असते. २०२४- २५ मध्ये आदिवासी खात्यासाठी १७ हजार २०० कोटी रुपयांची तरतुद होती. यंदा ही तरतुद वाढवून मागितली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आदिवासी समाजाबाबत विशेष प्रेम आहे. त्यामुळे ते निश्चित आदिवासी खात्याला निधी वाढवून देण्याची आशा आहे. या निधीतून आदिवासी बांधवांच्या विकासाशी संबंधित विविध विकासात्मक प्रकल्पावर आणखी गतीने कामे होतील.

आदिवासी कल्याण मंत्री म्हणून राज्यात वेगवेगळ्या भागातील आदिवासींसाठी वेगवेगळ्या पद्धतीच्या योजनेसाठी प्रयत्न करणार आहे. गडचिरोलीतील आदिवासी बांधवांकडे वेगळे गुण व कला कौशल्य राहतात.

त्यामुळे तेथील आदिवासींसाठी तिथल्या परिस्थितीनुसार योजना हवी. तर इतर भागात तेथील आदिवासींच्या गुण व आवडीनुसार ही योजना गरजेची आहे. त्यानुसारही आदिवासी खाते प्रयत्न करत असल्याचेही डॉ. उईके यांनी सांगितले.

**एक दिवस वसतिगृहात**

आदिवासी खात्याकडून एक दिवस आश्रमशाळेत हा उपक्रम ७ फेब्रुवारीला राबवला होता. त्यानुसार आदिवासी कल्याण मंत्री म्हणून माझ्यासह सगळ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून दुर्गम व मागास भागासह सगळ्याच आश्रमशाळेत मुक्काम केला गेला. त्यातून तेथील विद्यार्थी व संबंधित यंत्रणेशी संवाद साधून समस्या जाणून घेतल्या. हे प्रश्न सोडवले जाणार आहे.

आता राज्यभरातील आदिवासींच्या मुले-मुलींच्या वसतिगृहातही या पद्धतीचा उपक्रम राबवणार असल्याचेही डॉ. उईके यांनी सांगितले. त्यातून समस्या जाणून त्याही सोडवणार असल्याचीही माहिती त्यांनी दिली.

**आदिवासींसाठी १२१ डिजिटल शाळा**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार १०० दिवसांत आदिवासींसाठी राज्यात १०० डिजिटल शाळा उभारल्या जाईल. सोबत केंद्र सरकारच्या आदिवासींबाबतच्या आयोगाप्रमाने राज्यातही आदिवासींबाबत वेगळा आयोग तयार करण्याचा प्रयत्न आहे. इतरही वेगवेगळ्या पद्धतीने आदिवासींचा सर्वांगिण विकासाचा प्रयत्न असल्याचेही डॉ. उईके यांनी सांगितले.

# आरोपींना पकडायला गेलेल्या पोलिसांवर दगडफेक

**शिपाई जखमी**

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १८ :

भिवंडी शहरात पोलिसांच्या वाहनावर स्थानिक जमावाने तूफान दगडफेक केल्याची घटना घडली. अल्पवयीन मुलीसह तिच्या आई वडिलांना मारहाण केलेल्या आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलिस भिवंडी या भागात गेले होते. मात्र येथील स्थानिकांनी पोलिसांवरच हल्ला केला आहे. या हल्ल्यात एक पोलिस जखमी झाला असून पोलिसांच्या वाहनाची तोडफोड झाली आहे.

भिवंडी शहरातील वऱ्हाळ देवी नगर कामतघर या झोपडपट्टी परिसरात शेजाऱ्यांमधील मुलांचे प्रेमप्रकरण असल्याच्या संशयावरून भांडण झाले होते. यात अल्पवयीन मुलीसह तिच्या आई वडिलांना देखील मारहाण करण्यात आली. घाबरलेल्या मुलीने फिनेल पिऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. पालकांनी तिला रुग्णालयात दाखल केले.

आरोपी हे वऱ्हाळ देवी नगर झोपडपट्टी येथे असल्याची माहिती घेतल्यानंतर पोलिस उपनिरीक्षक आकाश पवार आणि सुनील शिंदे, तडवी हे पथक पोलिस जीप घेऊन घटनास्थळी आरोपींना पकडण्यासाठी गेले. या वेळी गुंड प्रवृत्तीच्या युवकांनी व जमावाने पोलिसांवर व पोलिस वाहनावर दगडफेक करत हल्ला चढवला. यात एक शिपाई जखमी झाला.

# विभागीय आयुक्तालयात छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन



■ महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. १८ :

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त आज विभागीय आयुक्त कार्यालयात विभागीय आयुक्त श्वेता सिंघल यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.

यावेळी उपायुक्त संतोष कवडे, राजेंद्र फडके, सहाय्यक आयुक्त वैशाली पाथरे, तहसीलदार प्रज्ञा काकडे यांच्यासह अन्य अधिकारी-कर्मचारी आदी उपस्थित होते. उपस्थितांनीही छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करुन विनम्र अभिवादन केले.

# डान्सबारमध्ये बारबालांवर नोटा उधळण्यावर बंदी घालणार

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १८ :

डान्सबारसंबधात नवीन कायदा करण्याचे राज्य सरकारच्या विचाराधीन आहे. मंगळवारच्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत डान्स बार कायदा सुधारणासंदर्भात चर्चा झाल्याची माहिती आहे.

सुप्रीम कोर्टाने सुचवलेल्या सूचनांनुसार कायद्यात सुधारणा करण्यात येणार आहे. येत्या अधिवेशनात डान्सबार बंदी कायद्यात सुधारणा करण्याबाबतचं विधेयक मांडलं जावून मंजूर केलं जाण्याची शक्यता आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली राज्य मंत्रिमंडळाची बैठक पार पडली या बैठकीत डान्सबार संदर्भातही महत्वाची चर्चा करण्यात आली. नवीन नियमावलीत डान्सबारमध्ये नोटांची उधळण करता येणार नाही. नव्या कायद्यात डिस्को आणि आर्केस्ट्रा यासंदर्भात राज्य सरकारची परवानगी संदर्भात हा बदल करण्यात येणार असून, अनेक नवीन नियम असण्याची शक्यता आहे डान्सबार संदर्भात नियम आणि कायदा करताना समितीमध्ये डान्सबार यांचा प्रतिनिधी असावा, अशा काही नियमांचा समावेश नवीन कायद्यात करण्यात येण्याची शक्यता आहे.

२००५ साली तत्कालीन गृहमंत्री आर. आर. पाटील यांनी डान्सबार बंदीचा निर्णय घेतला होता. तरुणांमध्ये वाढती व्यसनाधीनता, बारबालांवर पैसे उधळण्यासाठी गैरप्रकार करणे, गुन्हेगारीत वाढ होणे, अशा विविध कारणांनी ही बंदी घालण्यात आली होती.

या विरोधात डान्सबार मालकांनी या निर्णयाविरोधात न्यायालयात धाव घेतली. अखेरीस सर्वोच्च न्यायालयाने बंदी उठवली, मात्र कडक अटी आणि नियम लागू केले होते. २०१६ साली फडणवीस सरकारने नवा कायदा केला होता. या कायद्यात आता नव्या तरतुदी करून नवीन नियम करण्याचे सरकारच्या विचाराधीन आहे.

**येत्या अधिवेशनात नवीन कायदा मंजूर होण्याची शक्यता**



**: लोकसेवार्थ :**

# स्त्री प्रबोधनासाठी झटणारी संस्था 'दृष्टी



**लोकजागर**

समाजातील प्रत्येक स्त्री सुशिक्षित आणि सक्षम झाली तर अखंड समाजाची प्रगती होते. यावर विचार करताना स्त्रीविषयक विविध अंगाने विविध ठिकाणी येणाऱ्या, प्रकाशित होणाऱ्या बातम्या, माहिती संकलन करून त्याचा एक डेटा बेस असावा आणि त्याच्या वर्गवारीतून स्त्रियांचं प्रबोधन करावं या उद्दिष्टाने १३ जणींनी मिळून दृष्टी स्त्री अध्ययन प्रबोधन केंद्राची स्थापना केली.

सध्या डॉ अंजली देशपांडे या ट्रस्टच्या सचिव असून गीताताई गोखले या अध्यक्षा आहेत. ज्या ज्या संस्था महिलांच्या सबलीकरणासाठी काम करत आहेत अशाना त्याचाच फायदा होतोच त्याशिवाय या माहितीचा उपयोग एमएसडब्लू, एमफिल करणाऱ्या विद्यार्थ्यांनासुद्धा होत असतो. वृत्तपत्र आणि नियतकालिकातून महिलाविषयक बातम्या, माहिती आणि आकडेवारीचे संकलन संस्थेकडून केले जाते.

नंतर शिक्षण, आरोग्य, रोजगार, कौटुंबिक सामाजिक अशा जवळपास १७ मथळ्याखाली या बातम्यांचे वर्गीकरण केले जाते. संस्थेचे कार्यकर्ते विविध विभागात जाऊन सर्वेक्षण करतात. अशा प्रकारे संस्थेकडे एक डेटा बेस तयार होतो. मागील १० वर्षांची माहिती संस्थेकडे स्कॅन च्या स्वरूपात उपलब्ध आहे.

संस्था ट्रस्ट तर्फे महिलांसाठी महिलाविश्व हे मासिक देखील मराठी,हिंदी आणि इंग्रजी भाषेत प्रकाशित करते. या मासिकाच्या माध्यमातून देखील महिलांचे प्रबोधन होते. संस्थेने एक संशोधन प्रकल्प देखील हाती घेतलेला आहे. ओडिशा, झारखंड, छत्तीसगड येथून काही आदिवासी स्त्रिया महाराष्ट्रात घरकाम आणि मोलमजुरी करिता येतात त्यामागची कारण शोधण्यासाठी हे संशोधन होते.

हरियाणात मुलगा मुलगी जन्माच व्यस्त प्रमाण,तसेच ईशान्य भारतातल्या स्त्रियांची सामाजिक स्थिती यावर या यावर्षी संशोधन प्रकल्प संस्थेनं हाती घेतलेला आहे. पुणे महानगरपालिकेच्या संयुक्त विद्यमाने संस्थेने महिला नागरसेविकांसाठी जेंडर बजेट या विषयावर एक प्रशिक्षण वर्ग देखील आयोजित केला होता. पीएमसी च्या आर्थिक नियोजनात स्त्री पुरुष समानता कशी राखली जावी? आणि महापालिकेतर्फे करण्यात येणाऱ्या खर्चाचा फायदा पुरुषाइतकाच स्त्रियांना देखील कसा होऊ शकेल? याविषयीची माहिती देण्यात आली.

एकूणच, समाजातील विविध वर्गातील स्त्रियांच्या प्रबोधनासाठी आणि त्यातूनच त्यांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी दृष्टी सारखी संस्था अशा स्त्रियांना जगण्याची नवी दृष्टीच देते आहे असं नक्की म्हणता येईल.

■ ■

भारतात तरुण उद्योजकांची संख्या वेगानं वाढत आहे. आश्चर्याची बाब म्हणजे यातले बहुतांश उद्योजक ३० वर्षांपेक्षा कमी वयाचे आहेत. काहींनी त्यांच्या स्टार्टअपसाठी नोकरी सोडली, तर काहींनी शिक्षण अर्धवट सोडलं. तरुण उद्योजकांच्या अशा अनेक कथा तुम्ही वाचल्या असतील.

अशाच एका नवख्या तरुण उद्योजकाची यशोगाथा पाहू या, ज्याने आपल्या जिद्दीच्या बळावर लहान वयात मोठं यश मिळवलं आहे. मिसबाह अश्रफ असं या उद्योजकाचं नाव आहे. शाळेत दोनदा नापास होऊनही बिहारमधल्या मिसबाह अश्रफने २४६३ कोटी रुपयांची फिनटेक कंपनी उभी केली आहे. मूळचा बिहारचा असलेला मिसबाह वारंवार मिळालेल्या अपयशाने खचून गेला नाही. अनेकदा प्रयत्न केल्यानंतर अखेर त्याला यश मिळालं आणि वयाच्या २९ व्या वर्षी तो फोर्ब्जच्या फोर्ब्ज अंडर ३० यादीत समाविष्ट झाला.

अश्रफचा जन्म बिहारच्या नालंदा जिल्ह्यात झाला. मध्यमवर्गीय कुटुंबात त्याची जडण-घडण झाली. लहानपणापासून त्याला आयुष्यात काही तरी मोठं करण्याची इच्छा होती. त्याने लहान वयातच काम करण्यास सुरुवात केली. उच्च शिक्षणासाठी मिसबाहने कॉलेजमध्ये प्रवेश घेतला; पण पहिल्या वर्षीच त्याने शिक्षण सोडलं. सप्टेंबर २०१३ मध्ये आयआयटी दिल्लीतल्या त्याच्या मित्रासोबत त्याने सिबोला हा सोशल पेमेंट उपक्रम सुरू केला; मात्र काही महिन्यांनी ही कंपनी बंद पडली.

चार वर्षांनंतर त्यानं मार्सप्ले नावाचं आणखी एक स्टार्ट-अप सुरू केलं. त्यामध्ये मिसबाहला प्रचंड यश मिळालं आणि त्यांनी कंपनी आपल्या ताब्यात घेतली; पण कोरोनाच्या काळात कंपनीला खूप फटका बसला. परिणामी त्याला ती कंपनी विकावी लागली. जेव्हा देशात कोरोना महामारीची दुसरी लाट सर्वोच्च पातळीवर पोहोचली होती, तेव्हा मे २०२१ मध्ये मिसबाहनं जार नावाचं तिसरं बिझनेस व्हेंचर सुरू केलं. बचत आणि गुंतवणूक ही या स्टार्टअपची संकल्पना आहे. केवळ १८ महिन्यांत त्याला ११ दशलक्ष युझर्स मिळाले. पुढच्या पाच वर्षांत युझर्सची संख्या ५० दशलक्षपर्यंत वाढवण्याचा कॉलेज सोडल्यानंतर मिसबाहनं पल्स. क्यूए (वायसी), परस्यूट, टॉयमेल (वायसी), स्पॅंगल इत्यादी कंपन्यांमध्ये काम केलं आहे. जार ॲपच्या मदतीनं कमी बचत करूनही सोन्यात गुंतवणूक करता येते. जारचे ॲक्टिव्ह युझर्स देशभरात आहेत. विशेष बाब म्हणजे या स्टार्टअपचे निम्म्याहून अधिक युझर्स टिअर वन शहरातले आहेत. कंपनीचं मुख्य कार्यालय बेंगळुरूत आहे. आपल्याला ज्यात रस आहे अशा व्यवसायात एकाग्रतेने लक्ष घातलं तर यश हे आपलच असतं.

**शब्दार्थ**

**CPU**

सेंट्रल प्रोसेसिंग युनिट (CPU)चे संक्षिप्त रूप म्हणजेच सी.पी.यू . सीपीयू संगणकामधील इलेक्ट्रॉनिक सर्किटरी आहे. संगणकाव्दारे निर्देशित केलेले कार्य घडवून आणण्याचे काम सीपीयू करते. CPU ला आणखी सेंट्रल प्रोसेसर, मुख्य प्रोसेसर किंवा जस्ट प्रोसेसर असेही म्हटले जाते. सी.पी.यु ला कोणतेही कार्य घडवून आणण्यासाठी भिन्न भिन्न ऑपरेशन्सचा सहारा घ्यावा लागतो. उदा. अंकगणित, तर्कशास्त्र, नियंत्रण तसेच इनपुट आणि आऊटपुट ऑपरेशन इत्यादी.

■ ■

**: शुन्यातून विश्व :**

## शाळेत अपयशी विद्यार्थी व्यवसायात झाला कोट्यधीश



: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

## राज्यातील ९ सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्या

■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १८ :

राज्य सरकारने भारतीय प्रशासकीय सेवेतील ९ सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश जारी केले. त्यानुसार राज्य उत्पादन शुल्क विभागाचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांची बदली कोकण विभागीय आयुक्त म्हणून झाली आहे. तर कोकण विभागीय आयुक्त डॉ. राजेश देशमुख यांची नेमणूक राज्य उत्पादन शुल्क आयुक्त म्हणून करण्यात आली आहे.

आदिवासी विकास आयुक्त नयना गुंडे यांची बदली महिला आणि बालविकास आयुक्त, पुणे येथे झाली आहे. समग्र शिक्षा अभियानाच्या राज्य प्रकल्प संचालक विमला आर. यांची नेमणूक निवासी आयुक्त आणि सचिव म्हणून महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली येथे करण्यात आली आहे. अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी सिद्धराम सालीमठ यांची बदली साखर आयुक्त, पुणे येथे झाली आहे. तर भंडारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून मिलिंदकुमार साळवे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

धाराशिवचे जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंबासे यांची बदली सोलापूर महापालिका आयुक्तपदी, राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक लीना बनसोड यांची बदली आदिवासी विकास आयुक्त, नाशिक येथे झाली आहे.

# पद्मश्री डॉ. विलास डांगरे यांचा दैनिक महासागरच्यावतिने सत्कार



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १८ :

नागपूरचे प्रसिद्ध होमिओपॅथी डॉक्टर आणि नरकेसरी पब्लिकेशन्स लिमिटेड, नागपूरचे अध्यक्ष डॉ. विलास डांगरे यांना केंद्र सरकारने पद्मश्री पुरस्काराने सन्मानित केल्याबद्दल दैनिक महासागरतर्फे त्यांच्या निवासस्थानी जाऊन पुष्पगुच्छ देत त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी दैनिक महासागरचे संपादक श्रीकृष्ण चांडक यांच्यावतिने दैनिक महासागरचे चीफ एक्झिक्युटिव्ह ऑफिसर उमाशंकर लाल, जनसंपर्क अधिकारी कमल नामपल्लिवार तसेच वरिष्ठ पत्रकार व निसर्गोपचार आणि योग थेरपिस्ट डॉ. प्रवीण डबली प्रामुख्याने उपस्थित होते.

यावेळी डॉ. डांगरे यांनी दैनिक महासागर अनेक वर्षापासून आपली सामाजिक भूमिका निभावत आल्याबद्दल कौतुक केले. डॉ. डांगरे नागपूर आणि विदर्भातील अनेक रुग्णांना कमी किमतीत होमिओपॅथिक औषधे पुरवतात, कधीकधी तर मोफत उपचारही करतात.

भारतातील अनेक प्रसिद्ध व्यक्तींना डॉ. डांगरे यांच्या उपचारांचा फायदा झाला आहे आणि आजही अनेक व्हीव्हीआयपी त्यांच्या वैद्यकीय सल्ल्याचा आणि औषधांचा फायदा घेतात.

बाळासाहेब देवरस (तिसरे सरसंघचालक), हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे, श्रीमती सुषमा स्वराज यांचा समावेश आहे. त्याचप्रमाणे, विद्यमान केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, महाराष्ट्राचे माजी राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांसारख्या प्रतिष्ठित व्यक्तींना यापूर्वी या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

# रामटेकममधील सेक्स रॅकेटमध्ये उच्चशिक्षित तरुणींचा सहभाग

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १८ :

देहव्यापाराचे लोण ग्रामीण भागातही पसरले आहे. कोलकाता, दिल्ली, गोवा, हरियाणा, आसाम, जम्मू काश्मीर याराज्यासह पुणे, मुंबई, रत्नागीरी, छत्रपती संभाजीनगर आणि नाशिकमधील तरुणींना नागपुरात सेक्स रॅकेटमध्ये सहभागी करण्यात येत आहे.

नुकताच रामटेकमधील एका मोठ्या हॉटेलवर पोलिसांनी छापा घातला. या छाप्यात रत्नागीरीच्या उच्चशिक्षित तरुणीला आंबटशौकिन ग्राहकासह पकडण्यात आले. हॉटेलमालकासह सहा जणांवर रामटेक पोलिसांनी गुन्हे दाखल केले.

रामटेकमधील नगरधन येथे असलेले अमरज्योती लॉज अँड रेस्ट्रॉरेंट हे आंबटशौकीन ग्राहकांसाठी प्रसिद्ध आहे. या हॉटेलमध्ये महाराष्ट्रातील काही जिल्ह्यातील तरुणींसह अन्य राज्यातील तरुणी देहव्यापार करण्यासाठी येत असतात. दिल्ली, मुंबई आणि कोलकाताच्या तरुणी महिन्याभराचा करार करुन सेक्स रॅकेटमध्ये सहभागी होत असतात. एका तरुणीला हॉटेलमध्ये राहण्याची व्यवस्था आणि जवळपास ८० हजार ते एक लाख रुपयांमध्ये २५ दिवसांचा करार केल्या जाते. दिल्ली आणि मुंबईच्या तरुणी विमानाने प्रवास करतात.

या तरुणींना फार्महाऊस आणि विशेष आयोजित पाट्यांमध्ये तरुणींना पाठवण्यात येते. रामटेकमधील हॉटेलमध्ये आंबटशौकीन ग्राहकांनी पैसे मोजल्यानंतर काही तरुणींचे फोटो दाखवले जातात. फोटोतील तरुणींची निवड केल्यानंतर त्या तरुणीला ग्राहकासोबत पाठवल्या जाते.

या प्रकारामुळे शहर आणि ग्रामीण भागातील अनेक आंबटशौकिनांची गर्दी या हॉटेलमध्ये वाढली होती. रामटेकचे ठाणेदार आसाराम शेट्ये यांना माहिती मिळताच त्यांनी बनावट ग्राहक पाठवून देहव्यापार सुरु असल्याची खात्री केली. त्यानंतर सापळा रचून कारवाई करीत रत्नागिरीच्या तरुणीला देहव्यापार करताना ताब्यात घेतले. तिची रवानगी नागपुरातील महिला सुधारगृहात करण्यात आली. ती तरुणी पूर्वी मुंबईत एका मोठ्या हॉटेलमध्ये सुरु असलेल्या सेक्स रॅकेटशी जुळलेली होती.

**तरुणींचे आर्थिक शोषण**

रामटेक-नगरधनमधील अमरज्योती लॉज अँड रेस्ट्रॉरेंटमध्ये आरोपी हॉटेलमालक प्रशांत कामडी, गोपी ठाकूर आणि मॉटी नगरे यांनी देहव्यापार सुरु केला होता. अनुराग विजय गौर, आकाश घिरसिंग बिरवे आणि राहुल प्रेम रॉय हे तिघे आंबटशौकिन ग्राहकांना हॉटेलमध्ये घेऊन जात होते.

रत्नागीरीतील पीडित तरुणीने अभियांत्रिकीची पदवी घेतली असून ती मुंबईत महाविद्यालयीन शिक्षण घेतानाच देहव्यापाराशी जुळली होती. मॉटीने तिला नागपुरात देहव्यापार करण्यासाठी बोलावले होते. हॉटेलमालक आणि मॉटी नगरे हे एका ग्राहकाकडून १० ते १५ हजार रुपये घेत होते. मात्र, पीडित तरुणीला केवळ एक हजार रुपये देऊन तिचे आर्थिक शोषण करीत होते, अशी माहिती पोलिसांनी दिली.